|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : २७ सोमवार दि. २२ जून २०२० ते रविवार दि. २८ जून २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## संतापजनक आहे सरकारचे मौन 'या' आत्महत्यांना जबाबदार कोण?

कोरोनाच्या भीतीने सरकार पुन्हा पुन्हा लॉकडाऊन करीत आहे, पण या लॉकडाऊनमुळे जे उद्योगधंदे बंद होत आहेत आणि या उद्योग धद्यांमधले जे लोक बेरोजगार होऊन उपासमारीच्या वाटेवर आहेत, त्यांच्या पोटापाण्याचे काय? त्यांनी हताश होऊन आत्महत्याच करायच्या का? आणि या लोकांनी आत्महत्या केल्या तर उद्या त्यांच्या पोराबाळांची जबाबदारी केंद्र किंवा राज्य सरकार घेणार आहे का? राजकारणातील लोकांकडे पैसा आहे, त्यांना लॉकडाऊन कितीही काळ राहिला तरी फरक पडणार नाही. पण जो सामान्य माणूस आहे, त्याच्यासाठी लॉकडाऊच्या काळातला एक एक दिवस हा एकेक वर्षासारखा वाटतोय. शिवाय या पुढे जी परिस्थिती निर्माण होणार आहे ती कोरोना पेक्षाही भयंकर असेल, तेंव्हा लोकांनी काय करायचे? याचे उत्तर सरकारने द्यावे आणि लॉकडाऊन काळातील नुकसानीची जबाबदारी घ्यावी.

**वाकड येथे नोकरी गेल्याने प्रशांत सेठ या आयटी अभियंत्याची आत्महत्या, उच्च शिक्षित तानिका शर्मा हिने इमारतीवरून उडी टाकून जीवन संपवले, रोजगाराच्या चिंतेने ज्ञानदेव काशीद यांनी गळफास घेतला!**

**वडगाव धायरी येथे स्वप्नील धाय्कर या मंडप डेकोरेटर्सने गळफास घेऊन आत्महत्या केली, तर नागपूरमधील लॉकडाऊनमुळे रोजगार बुडाल्याच्या चिंतेतून दोन तरुणांसह सहा जणांची आत्महत्या...**

**नांदेड येथे सलून बंद पडल्याने नाभिकाची विष पिऊन आत्महत्या तर भंडाऱ्यात सलून मालकाचा आत्मदहनाचा प्रयत्न केला परंतु त्याला वाचविण्यात यश आले...**

# नोकरी-धंदा गेल्यामुळेच आली आत्महत्येची पाळी महाराष्ट्रातील लॉकडाऊनने घेतला १५ जणांचा बळी

पुणे/लक्ष्मणराव पाटोळे

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने जो गेले अडीज महिने लॉकडाऊन केला आहे त्यात अनेक उद्योगधंदे बंद पडल्यामुळे लाखो कुटुंबांवर उपासमारीची पाळी आलीय. त्यामुळे आपले आणि आपल्या कुटुंबाचे भविष्यात काय होणार या चिंतेने ग्रासलेल्या अनेक लोकांच्या मनावर परिणाम झाला आहे. आता आपले काही खरे नाही या भीतीने काहींना पछाडले आहे आणि याच भीतीतून वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या पण रोजगार गमावल्याने उपासमारीची पाळी आलेल्या महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील तब्बल १४ लोकांनी आत्महत्या केली आहे. या पैकी एका दांपत्याने तर आपल्या दोन मुलांना ठार मारून आपले जीवन संपवले आहे. त्यामुळे लॉकडाऊनने घेतलेल्या बळींची संख्या आता १५ झाली आहे, तर आत्मदहन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एकाला कसेबसे पोलिसांनी वाचवले आहे. अशा स्थितीत या पुढेही लॉकडाऊन सुरूच राहिला आणि लोक बेरोजगार झाले, तर आत्महत्या करणाऱ्यांची संख्या अधिक वाढू शकते. त्यामुळे करायचे तरी काय? कारण एकीकडे कोरोनाची भीती, तर दुसरीकडे लॉकडाऊनमुळे अर्थ व्यवस्था बुडण्याची भीती आणि त्याही पेक्षा भयंकर म्हणजे नोकरीधंदा गमावल्याने हतबल झालेले लोकं आत्महत्या करीत असल्याचे टेन्शन, अशा विचित्र कात्रीत सरकार सापडले आहे.



पुणे सुखसागर नगर येथे दोन मुलांना ठार मारून पती पत्नीची आत्महत्या

देशात २५ मार्च पासून लॉकडाऊन सुरु झाला आणि सर्व उद्योगधंदे बंद पडले. तसेच रेल्वेसह सर्वच परिवहन सेवा बंद पडल्याने लोकांना घराबाहेर पडणे मुश्कील झाले. हातात जो काही थोडा फार पैसा होता तो घर खर्चावर संपला. त्यातच काही लोकांच्या अंगावर कर्ज होते, त्या कर्जाचे हप्ते तर जे लोक भाड्याने राहायला होते त्यांची भाडी थकली. घरातील मुलांचा खर्च आजारपण आणि या सर्वांसाठी लागणारा पैसा कुठून आणायचा या विवंचनेत प्रत्येक जण होता. त्यातच सरकारकडून सतत लॉकडाऊन वाढवले जावू लागले. त्यामुळे उद्योगधंदे सुरु होणार कि नाहीत याची खात्री वाटेना, त्यामुळे लोकांच्या जीवाची घालमेल सुरु झाली आणि त्यातूनच आत्महत्यांचे सत्र सुरु झाले. पुण्याच्या सुखसागर नगर येथे अतुल




नांदेड येथे सलून बंद पडल्याने नाभिकाची विष पिऊन आत्महत्या

दत्तात्रय शिंदे आणि जया शिंदे या दांपत्याने आपल्या ऋग्वेद ६ आणि अंतरा ३ या दोन मुलांची हत्या करून स्वत:ही आत्महत्या केली. अतुल शिंदे यांचा शाळेतील मुलांची ओळखपत्र तयार करण्याचा व्यवसाय होता. पण लॉकडाऊनमध्ये शाळा बंद असल्याने त्यांचा व्यवसाय सुद्धा बंद पडला. त्यातच हे ...पान २ वर

# मित्राच्या बायकोचा सहवास त्याला नडला विश्वासघातकी मित्राचा मुडदाच त्याने पाडला







सांगली/क्राईम रिपोर्टर

स्त्री सुखाला चटावलेले वासनांध लांडगे मैत्री किंवा नात्यागोत्याचीही परवा करीत नाहीत. काही लंपट तर मित्राच्या बायका मुलींवर वाईट नजर ठेवून असतात आणि कधी पैशाच्या तर कधी प्रतिष्ठेच्या जोरावर मित्राच्या बायकोला आपल्या जाळ्यात ओढून त्यांच्याशी अनैतिक संबंध ठेवतात, पण असे अनैतिक संबंध अधिक काळ लपून राहत नाहीत. कधीना कधी ते उघडकीस येताच असतात सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्र येथेही असेच घडले. एका स्त्री लंपट श्रीमंत शेतकऱ्याने चक्क मित्राच्या बायकोलाच आपल्या जाळ्यात ओढले आणि तिचा उपभोग घेवू लागला. मात्र एकेदिवशी त्याच्या मित्राने दोघांना रंगेहात पकडताच मैत्रीचे रूपांतर दुष्मनीत झाले आणि संधी मिळताच आपल्या पत्नीला नादी लावून मैत्रीचा विश्वासघात करणाऱ्या मित्राचे शिरच त्याने धडावेगळे केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

देवराष्ट्रे येथील जयसिंग जमदाडे हा सधन कुंटुंबातील शेतकरी होता.त्याची शेती बऱ्यापैकी होती. त्यातुन त्याला उत्पन्न ही चांगले मिळत होते. त्यामुळे त्याच्या हातात पैसा ही चांगला खेळत होता. त्याला पत्नी मुले असले तरी त्याला परस्त्रीचा नाद भारी होता.त्यातुन त्याची नजर ही गावातील बायकाच्यावर जात होती. त्यातच तो मित्र असलेल्या लक्ष्मण मुंडे याच्या घरी येत जात होता. ते दोघे चांगले मित्र होते. मुंडे याच्या घरी सारखे त्याचे येणे जाणे असल्याने त्याची बायको जयसिंगला चांगले ओळखत होती. ती जरी मध्यमवयीन प्रौढ असली तरी ती दिसायला देखणी आणि सुंदर होती.त्यामुळे मित्राच्या देखण्या ...पान २ वर


# निस्सीम प्रेमाची तिच्या शोकांतिका झाली मुलीच्या प्रियकराची आईनेच हत्त्या केली

नाशिक/क्राईम रिपोर्टर

मुलीचे प्रेम प्रकरण हा आई-वडिलांसाठी चिंतेचा विषय असतो. अशावेळी कधी मुलीला प्रेमाने समजावले जाते, तर कधी दमदाटी करून तिला तिच्या प्रियकरापासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला जातो आणि हे दोन्ही प्रयत्न जेंव्हा अयशस्वी ठरतात तेंव्हा मग टोकाचा निर्णय घेतला जातो. कातोरेवाडी येथील चंगुनाबाई हिनेही तेच केले. वयात आलेली तिची मुलगी गावातल्याच एका तरुणाच्या प्रेमपाशात अडकली होती. मात्र चंगुनाबाईला मंजूर नव्हते. त्यामुळे तिने सुरवातीला आपल्या मुलीला समजावण्याचा प्रयत्न केला, पण ती ऐकायला तयार नव्हती. त्यामुळे चंगुनाबाईने आपल्या मुलीचे दुसऱ्या मुलाशी लग्न ठरवले. पण मुलीच्या प्रियकराने लग्नात अडथला आणू नये म्हणून आपल्या सावत्र मुलाच्या मदतीने मुलीच्या प्रियकराचा काटा काढला. मात्र पोलिसांनी या शातीर महिलेला तिचा सावत्र मुलगा आणि त्याच्या साथीदारांसह अटक केली आहे.





प्रेम कितीही लपवून ठेवले तरी ते लपत नसते. पंडीत व त्याची गावातील प्रेयसी यांच्यात देखील असेच झाले. कातोरेवाडी येथील रहिवासी असलेला पंडीत आणि चंगुनाबाईची मुलगी यांच्यातील प्रेम दिवसेंदिवस बहरत गेले. एके दिवशी दोघांच्या प्रेमाची भनक चंगुनाबाईला लागण्यास वेळ लागला नाही. ...पान २ वर

# दोघांच्या प्रेमात आडवी आली जात जातीमुळे झाला प्रियकराचा घात






पिंपरी/परमेश्वर गडदे

देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष झाली तरी अजूनही समाजातील जाती धर्माच्या भिंती कायम आहेत आणि याच जाती पतीच्या भिंतीमुळे समाज विभागला गेलाय. समाजात फुट पडलीय. आजही माणसाची खरी ओळख त्याच्या कर्तुत्वावरून नाही तर जाती-पातीवरून ठरतेय. मात्र त्याचा सर्वाधिक त्रास जातपात न मानणाऱ्या आजच्या पिढीला होतोय आणि त्यातूनच ओनर किलिंगच्या घटना घडत आहेत. पिंपरी येथे अशाच एका घटनेत एका हलक्या जातीतल्या मुलाने उच्च जातीतल्या मुलीशी प्रेम केले म्हणून मुलीच्या कुटुंबीयांनी त्याची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

प्रेमातून अनेकवेळा तरुण-तरुणी आंतरजातीय ...पान २ वर

# दारूच्या नशेत चौघांनी राडा केला मध्यस्थी करताना हॉटेल मालक मेला



जळगाव/क्राईम रिपोर्टर

दारूड्यांच्या नादाला सहसा कुणी लागू नये. कारण दारूची नशा डोक्यात गेलेल्या माणसाला आपण काय करीत आहोत याचे भान राहत नाही आणि त्यातच जर पिणारे गुन्हेगारी वृत्तीचे असले तर दारू प्यायल्यावर त्यांना आणखी चेव येतो आणि मग ते कुठेही राडा करतात. लॉकडाऊनच्या काळात हॉटेल बंद ठेवण्याचे आदेश होते. केवळ हॉटेलमधून पार्सल मिळत असे. मात्र जळगाव येथे एका हॉटेल मालकाला हॉटेल उघडणे चांगलेच महागात पडले. कारण गुन्हेगारी प्रवृतीच्या तिघांनी हॉटेलमध्ये जावून राडा केला आणि बियरच्या बाटल्या फोडल्या. यावेळी एक फुटलेली बाटली हॉटेल मालकाच्या दिशेने फेकण्यात आली ती त्याच्या गळ्यावर लागून गळा चिरला गेला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी चार संशयितांना अटक केली आहे.

पंकज वडनेरे यांच्या लग्नाचा आज वाढदिवस होता. लग्नाचा वाढदिवस असल्यामुळे पंकज वडनेरे आज मनोमन खुष होते. पोलिस दलातील कर्मचारी सुनिल वडनेरे यांचे सुपुत्र पंकज यांचा हसतमुख स्वभाव सर्वांना परिचीत आहे. त्यांचा होमगार्ड मित्र दिपक जगताप याने त्यांना ...पान २ वर



मयत



जखमी जगताप

जखमी पंकज



चार आरोपींना अटक

# नोकरीच्या बहाण्याने मुलालाच नाडले सावत्र आईला त्याने यमसदानी धाडले

नवी मुंबई/एस.कुमार



मयत रेश्मा

आई सख्खी असो किंवा सावत्र. आई आणि मुलाच्या नात्यामध्ये थोडासा का होईना पण मायेचा ओलावा असतो. पण आजवरचा सावत्र मातांचा इतिहास पाहता त्यांच्याकडून आपल्या सावत्र मुलाला कधीही मायेची उब मिळत नाही. त्यामुळे मग सावत्र मुलेही तिला विचारात नाहीत. आई आणि मुलांमधला सापत्नभाव दिवसेंदिवस वाढत जातो. नात्यातली दरी रुंदावल्यानंतर जेंव्हा एकमेकांचे संबंध खूपच ताणले जातात. तेंव्हा सावत्रपणाला द्वेषाची धार चढते आणि त्यातूनच मग दोघंही एकमेकांच्या जीवावर उठतात. नवी मुंबईतील राबोडी येथेही असेच घडले. अगोदरच छळवाद करणाऱ्या सावत्र आईने जेंव्हा नोकरी लावण्याच्या निमित्ताने आर्थिक फसवणूक केली, तेंव्हा चिडलेल्या मुलाने सावत्र आईला ठार केले. या प्रकरणी पोलिसांनी २४ तासात आरोपींना अटक केली.

दि.२९ मे २०२० चा दिवस होता. सकाळची वेळ होती. त्यादिवशी सकाळी राबोडी पोलीस स्टेशन येथे माहिती ...पान ६ वर

# दोन अल्पवयीन मुलांना वासनेची बाधा झाली ४ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून हत्या केली

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

इंटरनेटने आयटी क्षेत्रात मोठी क्रांती करून जगाला खूप जवळ आणले असले, तरी इंटरनेट या मायाजालात अशा काही वाईट गोष्टीही आहेत कि एकदा का माणूस त्यात गुरफटला कि त्यातून त्याची पावले आपोआप गुन्हेगारीकडे वळतात. खास करून अल्पवयीन मुलांना इंटरनेटवर सहज उपलब्ध होणाऱ्या अश्लील चित्रफिती पाहून त्या कोवळ्या मुलांच्या शरीरातही वासनेची आग भडकते आणि मग समोर दिसणारी कोणत्याही वयाची स्त्री त्याला भोगदासी वाटू लागते आणि त्यातूनच त्यांच्या हातून बलात्कार सारख्या घटना घडतात. इचलकरंजी शहरातील दोन अल्पवयीन मुलांनी एका चार वर्षांच्या मुलीला आपल्या वासनेची शिकार बनवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले आणि आपल्या पापाला वाचा फुटू नये म्हणून त्यांनी तिला विहिरीत ढकलून तिचा खून केला. मात्र पोलिसांनी या नराधमांना अटक केली आहे.



इचलकरंजीच्या औद्योगिक पसाऱ्यामुळे शहरालगतचा चंदुर हद्दीतील शाहूनगरचा भाग गेल्या १५ ते २० वर्षात झपाट्याने वाढला. येथे परराज्यातुन आणि बाहेरगावाहून आलेल्या लोकांची मोठया प्रमाणात वस्ती वाढली आहे. कर्नाटकातील गुलबर्गा जिल्हयातील करजगी येथुन एक कुटुंब गेल्या ४० वर्षापुर्वी इचलकरंजीला आपल्या उदरनिर्वाहासाठी आले. त्याची दुसरी पिढी ही इचलकरंजी शहरालगत असणाऱ्या चंदुर येथील शाहूनगर... पान ६ वर

# जमिनीसाठी सख्खा भाऊ वैरी झाला विष पाजून दादा वाहिनीचा खून केला

नांदेड/क्राईम रिपोर्टर

ग्रामीण भागात जमिनीचे वाद कधी कधी इतके विकोपाला जातात कि रक्ताच्या नात्यातली माणसेही कधी कधी काळ बनून आपल्याच नातेवाईकाच्या जीवावर उठतात. त्यामुळे असे वाद शक्य तितक्या लवकर मिटवायचे असतात. पण जर का हे वाद लवकर मिटले नाहीत कि त्यातून जे कायमचे वैर निर्माण होते ते कोणाच्याही प्राणावर बेतू शकते. नांदेड जिल्ह्याच्या माहूर तालुक्यातील जुनापानी येथे ९ एकर जमिनीच्या वादातून सख्या भावानेच आपल्या कुटुंबियांच्या मदतीने आपल्या भावाला आणि वाहिनीला विष पाजून ठार मारले. विशेष म्हणजे आरोपींमध्ये मयताची आई, दोन भावू त्यांच्या बायका आणि मुलांचाही समावेश आहे. ९ एकर जमिनीसाठी नात्याला काळिमा फासताना त्यांना जराही काही वाटले नाही.

माहूर तालुक्यातील जुनापाणी येथे जमिनीच्या वादातून पती-पत्नीस भावकीतील लोकांनी बळजबरीने विष पाजून ठार मारले. बंडू राठोड (५२) आणि यशोदाबाई राठोड (४५), अशी मृतांची नावे आहेत. सिंदखेड पोलिसांनी याप्रकरणी बुधवारी मध्यरात्री ९ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवून गुरुवारी दोघांना अटक केली आहे. ...पान ६ वर

# विनयभंगाच्या वादातून खून खराब झाला पतीला वाचवताना पत्नीचाच जीव गेला

जळगाव (यावल)/क्राईम रिपोर्टर

कोणताही माणूस परपुरुषाकडून आपल्या पत्नीचा झालेला अपमान सहन करू शकत नाही. पण यावल मध्ये तर गुलाब नावाच्या एका तरुणाने शेजाऱ्याच्या घरात घुसून त्याच्या पत्नीचा विनयभंग केला होता आणि तेंव्हापासून दोन कुटुंबांमध्ये वितुष्ट निर्माण झाले होते. त्यांच्यात सतत भांडणे होत असत भांडणासाठी त्यांना कोणतेही छोटेसे निमित्त लागायचे. एकेदिवशी विनयभंग झालेल्या महिलेच्या पतीने रागाच्या भरात अंगणात झोपलेल्या गुलाबच्या बापाच्या अंगावर बैलगाडी घातली आणि त्याला फरफटत नेले. त्यावरून पुन्हा दोन्ही कुटुंबात वाद झाला आणि हाणामारी सुरु झाली. यावेळी गुलाबची आई पतीला वाचवण्यासाठी पुढे आली असता तिला बेदम मारहाण करण्यात आली आणि या मारहाणीतच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली आहे. विनयभंगाच्या प्रकरणातून सुरु झालेल्या वादात एका निष्पाप महिलेला जीव गमवावा लागला.





विवाहीत करिश्मा (काल्पनिक नाव) रुपवान होती. तिच्या पतीला दारु पिण्याचे भारी व्यसन होते. दारुचा नाद पुर्ण करण्यासाठी तिचा पती पैसे उधळत असे. पतीच्या दारु पिण्याच्या व्यसनाला लगाम लागत नसल्याने करिश्मा पार वैतागली होती. दारुड्या नवऱ्याला पत्नीच्या रुपात करिश्मा सारखी रुपमती लाभली होती. करिश्माच्या देखणे रुप ...पान ६ वर

22 TO 28 JUNE 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 20/06/2020 7:36 PM Page 1



पान १ वरून....

## नोकरी-धंदा गेल्यामुळेच आली आत्महत्येची ...

कुटुंब भाड्याच्या घरात राहायचे अशा स्थितीत त्यांची कुचंबना झाल्याने मुलांना ठार मारून त्यांनी आत्महत्या केली, तर पुण्यातील वाकड परिसरात एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये एका आयटी अभियंत्यासह तिघांनी आत्महत्या केली. आयटी अभियंता प्रशांत सेठ याचे काम बंद असल्याने त्याची आर्थिक तंगी सुरु होती, त्याला कंटाळून राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली. तर तानिका शर्मा या उच्च शिक्षित महिलेचेही काम बंद असल्याने जगायचे कसे या विवंचनेतून इमारतीच्या आठव्या मजल्यावरून उडी टाकून आत्महत्या केली. तर ज्ञानदेव काशीद या इस्मानेही आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली, तर काळेवाडी येथे आत्महत्या करण्याच्या तयारीत असलेल्या एका इसमाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुण्यातच वडगाव धायरी येथे एका मंडप डेकोरेटरच्या व्यावसायिकाने गळफास घेवून आत्महत्या केली. लॉकडाऊनमध्ये व्यवसाय बंद असल्याने कर्जाचे हप्ते फेडायचे कसे या विवंचनेतून स्वप्नील उत्तम रायकर याने गळफास घेतल्याचे सांगितले जाते. लॉकडाऊनमध्ये सालूनही बंद आहेत. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या नाभिक समाजावर उपासमारीची पाळी आलीय. अनलॉकनंतर लॉकडाऊनमध्ये काही सवलती देण्यात आल्या. त्यात दारूच्या दुकानांपासून इतर सर्व दुकाने उघडायला परवानगी दिलीय, पण सालूनला मात्र परवानगी नसल्याने नांदेड जिल्ह्यातील इरली येथे राहणारे नवनाथ साळुंखे या नाभिकाने आपल्या ४ वर्षांच्या मुलासह विष घेतले. सुदैवाने त्याच्या मुलाला वाचवण्यात यश आले. पण नवनाथ मात्र मृत्युमुखी पडला. नवनाथचे सलून गेल्या अडीज महिन्यापासून बंद आहे. त्यामुळे त्याच्यावर उपासमारीची पाळी आल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. दरम्यान भंडारा शहरातील काही दुकानदारांनी दुकाने उघडल्याने प्रमोद केसालकर यांनीही आपले सलून उघडले. त्यामुळे त्यांना ५ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. अगोदरच इतके दिवस सलून बंद असल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले त्यात आणखी ५ हजाराचा दंड कुठून भरणा म्हणून केसालकर यांनी अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना वेळीच अडवल्याने पुढील अनर्थ टाळला. लॉकडाऊनमध्ये नागपूर शहरात तर ६ जणांनी आत्महत्या केली. नागपूरच्या एका खाजगी कंपनीत काम करणारा आणि नारायण पेठेत राहणारा विवेक लाडकर याचा लॉकडाऊनमध्ये रोजगार गेल्याने त्याने आत्महत्या केली. सुसाईड नोटमध्ये त्याने तसे लिहून ठेवले आहे. तर हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जगन्नाथ गुंणवंतराव ठाकरे यांनीही लॉकडाऊनमध्ये बेरोजगार झाल्याने आत्महत्या केल्याचे समजते, तर शांतीनगरमध्ये दिलीपचंद्र देवदास यांनी गळफास लावून आत्महत्या केली, तर पाचनाळचौक येथे अमोल जीवन पोटपोसे या २५ वर्षांच्या तरुणाने गळफास लावून आत्महत्या केली. गुरुकुल कुंज येथे शालिक रामजी धारपुरे (७०) यांनी आत्महत्या केली, तर गोरेवाडा येथे अभय दुबे या २२ वर्षांच्या तरुणाने गळफास लावून आत्महत्या केली. अशा ६ जणांनी लॉकडाऊनमुळे आलेल्या आर्थिक संकटाला कंटाळून जीवन संपवले. अशा तर्‍हेने गेल्या जवळपास अडीज महिन्यात महाराष्ट्रात लॉकडाऊंचे १५ बळी गेले.

## मित्राच्या बायकोचा सहवास त्याला नडला...

बायकोकडे जयसिंगची सारखी नजर जात होती.त्याला ती मनापासुन आवडत होती. तो तिला सारखे तिच्या मागे जावून वहिनी वहिनी म्हणुन लाळ घोळत होता. तिने ही त्याच्या मनातील ओळखले होते. म्हणुन ती ही त्याला लाईन देत होती. त्या दोघांच्या नजरेचा खेळ चालु असताना ती ही त्याला आपल्या टंच उरोजाचे दर्शन करीत त्याला खेळवत होती. कधी एकदा तिला आपल्या अंगाखाली घेऊन कुस्करतो असे त्याला झाले होते. म्हणुन तो लक्ष्मणच्या माघारी त्याच्या घरी येत होता. लक्ष्मणच्या घराची परिस्थीती ही तशी बेताचीच होती. त्यातच त्याने वयाची ५० ओलाडली असल्याने रात्रीच्या खेळात तो जरा कमी पडत होता.तो मुळचा कर्‍हाड तालुक्यातील साळशिरंबे येथील होता. येथे तो मेंढपाळचे काम करत होता. त्याची कमसीन आणि टंच बायको जवानीने तडफडत होती. अशातच जयसिंग तिच्यावर जाळे टाकत होता. आणि त्या जाळ्यात ती बरोबर अडकली होती. जयसिंगकडुन आपली जवानी ओरबाडुन घ्यावी असे तिला वाटत होते. तगडा जयसिंग ही याच संधीची वाट पाहत होता. तो लक्ष्मण याच्याशी मैत्री वाढवुन त्याला दारू प्यायला देत होता. तो मोलमजुरी करुन आपल्या कुंटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. घरात कायम पैशाची चणचण त्यातुन त्याला आयतीच दारु मिळत असल्याने तो ही खुश होता.पण जयसिंगच्या मनातील डाव त्याला ओळखता आला नव्हता. जयसिंग त्याच्या बायकोवर लाईन मारत होता. लक्ष्मणसमोर तो तिला वहिनी वहिनी म्हणुन तिच्या सौंदर्याची तारफ करत होता. याचा अर्थ लक्ष्मणला कळत नव्हता.तो फक्त दारूला भुलला होता. जयसिंग तर संधीची वाट पाहत होता. लक्ष्मणची टंच आणि देखणी बायको त्याच्या डोळ्यासमोरुन हलत नव्हती. एकदा संधी साधुन तो लक्ष्मणच्या घरी आला होता. तो तिच्याशी बोलत असताना ती ही त्याच्या शेजारी बोलत बसली होती. त्याने तिच्या मांडीवर नकळतपणे आपला हात ठेवला असता, त्याच्या गरम उबदार स्पर्शाने तिच्या ही मनात वासना चाळवली गेली होती. तिचे लक्ष त्याच्या पॅन्टेतील फुगीर भागाकडे जात होते. तो तिच्या डोळ्यात बघत होता. त्याचवेळी तिने आपल्या साडीचा पदर खाली पाडल्यावर तिच्या ब्लाऊजमधुन डोकावणाऱ्या टंच आणि कडक कबुतरे त्याला घायाळ करीत होते. तिने त्याचा हात आपल्या छातीवर ठेवल्यावर हिच संधी हेरुन त्याने तिला बेडवर तसेच आडवी केले आणि आपण तिच्यावर स्वार झाला. बघता बघता ते दोघे निर्वस्त्र होऊन शारीरिक सुखात तन मन धन विसरून लोळु लागले. तो ही तिला मनसोक्तपणे चोळत मोळत होता. त्याच्या दणकट अशा हत्याराने तिच्यात प्रवेश केल्यावर तो तिच्यावर तुटुन पडला. तशी ही त्याला आपल्या अंगावर ओढुन घेत होती. त्याने तिला तिचा नवरा लक्ष्मण याच्यापेक्षा भारी सुख दिले. पहिल्याच दणक्यात ते दोघे तृप्त झाले असल्याने त्याना परत परत असे सहवास सुख घ्यावे वाटत होते.त्यावेळेपासुन ती त्याला भावोजी म्हणत आपल्या अंगावर ओढुन घेत त्याच्याकडुन शारीरिक सुख ओरबाडुन घेत होती. गेल्या दोन तीन वर्षापासुन त्याचे विवाहबाहय संबंध सुरू होते. त्याच्या त्या संबंधाची गावात चर्चा होत होती.तशी ही चर्चा लक्ष्मणच्या कानावरही गेली होती. तो आता सावध झाला होता. त्या दोघांच्यावर तो पाळत ठेवुन होता.एकदा ते दोघे शारीरिक संबंध करत असताना त्याला रंगेहात सापडले होते. त्यावेळी त्याने या गोष्टीतुन पत्नीला चांगलेच झापले होते. तर जयसिंगलाही ताकीद देऊन त्याला मारायला तो त्याच्या अंगावर गेला होता. त्यावेळी शेजारच्या लोकांनी त्याचे भांडण सोडवुन घेतले होते. बायको आपल्या मित्रासोबत रंगेहात सापडल्यावर तो सैरभैर झाला होता. अलिकडे तो दारु पिऊन येऊन बायकोबरोबर भांडण काढुन तिला मारहाण करीत होता. तिला जयसिंगबरोबरचे संबंध तोडुन टाक म्हणुन सांगत होता. पण ती त्याच्या संबंधाला चटावलेली असल्याने ते संबंध तोडायला तयार नव्हती. त्या दोघांचे संबंध अजुन सुरूच होते. ही गोष्ट लक्ष्मणला खटकत होती. जयसिंगमुळे आणि बायकोमुळे आपली गावात इज्जत गेली. आपल्याला बेअब्रु व्हायला लागले असे त्याला वाटत होते. बायको सांगुन ही ऐकत नाही. म्हटल्यावर जयसिंगला कायमचा धडा शिकवायचा असा त्याने मनात निर्धार केला होता. त्याची गेम करायची म्हणुन तो त्याच्यावर बारीक नजर ठेवुन होता.तो कधी शेताकडे जातो,कधी एकटा असतो याचा त्याने बारकाईने आभ्यास केला होता. गुरूवार दि.४ जून २०२० रोजी जयसिंग हा नेहमीप्रमाणे आपल्या दुचाकी मोटार सायकली वरून वैरण आणण्यासाठी गेला होता.या गोष्टची भणक लक्ष्मणला लागली होती.तो कुठल्या रस्त्याने येतो हे त्याला माहित होते. म्हणुन तो त्याच्या शेताच्या वाटेवर जुना कुंभारगाव -शिरगाव रस्त्यावर सकाळी ११.३०च्या दरम्यान एका शिवारात दबा धरून बसला होता. पाणंदीतल रस्ता असल्याने त्या रस्त्यावर लोकांची फारसी वर्दळ ही नव्हती. जयसिंग हा त्या ठिकाणी आपल्या मोटर सायकलीवरून वैरण घेऊन येत असताना शिवारात दबा धरून बसलेला लक्ष्मण त्याच्या गाडीच्या समोर अचानक आडवा आला. त्याच्या हातात धारदार कुर्‍हाड होती.जयसिंगला काही कळायच्या आतच त्याने आपल्या कडील कुर्‍हाडीने त्याच्या मानेवर सपासप असे वार केले.त्यासरशी जयसिंगची मोटार सायकल वैरणीसह एका बाजुला पडली.तर तो दुसऱ्या बाजुला रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला होता.त्याच्या मानेतुन मोठया प्रमाणात रक्तस्राव होत असताना चिडुन परत लक्ष्मणने त्याच्यावर कुर्‍हाडीने वार केला.माझ्या बायकोबरोबर संबंध ठेवतोस काय आता वरती जावुन तिच्याबरोबर संबंध ठेव असे म्हणत त्याने त्याच कुर्‍हाडीने त्याचे शीर धडावेगळे केले.बायकोबरोबर संबध ठेवणाऱ्या जयसिंगचा त्याने कायमचा बंदोबस्त करुन त्याची गेम केल्यावर तो शांत झाला होता.त्याच्या हातातील कुर्‍हाड ही रक्ताने माखलेली होती.त्याच्या डोळ्यात आग दिसत होती.तो सैरभैर झाला होता.जयसिंगला मारुन तो आता भानावर आला होता.तसा तो खुन्नशी आणि तापट स्वभावाचा असल्याने जयसिंगला मारल्यावरच तो शांत झाला होता.घटनेनंतर तो घटनास्थळावरुन पळुन गेला होता.या घटनेची माहिती वांगी पोलीस स्टेशला समजल्यावर स.पो.नि.संतोष गोसावी हे आपल्या सहकार्यासह घटनास्थली दाखल झाले होते.या घटनेची माहिती मिळताच विटा पोलीस उपविभागीय अधिकारी अकुंश इंगळे हे देखिल घटनास्थळी येऊन त्यानी घटनेची पाहणी करून तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना केल्या होत्या. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवुन दिला.पोलीस संशयीत आरोपीचा शोध घेत होते. गुप्त खबऱ्याकडुन पोलीसांना माहिती मिळाली की, संशयीत आरोपी हा शिरगाव शिवारातील ऊसाच्या फडात लपुन बसला आहे.त्याच्या हातात कुर्‍हाड आहे. ही मिळताच पोलीस अधिक्षक सुहेल शर्मा, आणि अपर पोलीस अधिक्षक मनिषा दुबले व उपविभागीय पोलीस अधिकारी अकुंश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी मंगळवार दि.९ रोजी रात्री ११ च्या सुमारास पोलीसांनी त्या ऊसाच्या शेताला वेढा घातला. पोलीसाना बघुन लक्ष्मण मुंढे हा ऊसाच्या सरीतून पळुन जात होता. पोलीसांनी त्याला रात्रीच्या अंधारात पाठलाग करून मोठया शिताफिने पकडले. त्याला पोलीस स्टेशनला आणुन त्याच्याकडे या घटनेची पोलिसांनी चौकशी केली असता. त्याने आपला गुन्हा कबुल करुन तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी त्याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवुन त्याला मा.कोर्टासमोर उभे केले होते. मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडुन गुन्हयात वापरलेली कुर्‍हाड जप्त केली. या गुन्हयाचा तपास स.पो.नी संतोष गोसावी, पो.कर्मचारी पोपट पवार,अनिल वनवे गोविंद चन्ने, उदय देशमुख,अमर जंगम, आनंदा पवार, विशाल सांळुखे, रोहित कुंभार, राहुल कुंभार, सत्यवान मोहिते, पोलीस मित्र राजु जाधव, प्रकाश जाधव, सत्यवान शिरतोडे, डॉ.प्रमोद गावडे, श्रीदास होनमाने, विठ्ठल भोसले यांनी केले. या घटनेचा पुढील तपास स.पो.नी संतोष गोसावी हे करत आहेत. बाईच्या नादाला लागल्याने जयसिंग विनाकारण मारला गेला. तर लक्ष्मण हा आपल्या बायकोवर ताबा मिळवु शकला नाही म्हणुन ती परपुरूषाच्या नादाला लागली यातुन काहीच निष्पन्न झाले नाही.याचा अर्थ विवाह बाहय संबंधाचा शेवट असाच होतो हेच या घटनेवरुन दिसुन येते.

## निरस्सीम प्रेमाची तिच्या शोकांतिका झाली...

आपल्या मुलीचे गावातील पंडीतसोबत सुरु असलेले प्रेम प्रकरण कळताच तिच्या संतापाचा पारावार राहिला नाही. तिने तात्काळ आपल्या मुलीचे लग्न लवकरात लवकर उरकण्याचा निश्चय केला. त्या दृष्टीने ती कामाला लागली. तसेच यापुढे पंडीतच्या नादी लागायचे नाही अशी तिने आपल्या मुलीला तंबी देखील दिली. घरातून आईचे कडवे प्रवचन मिळाल्याची कथा पंडीतला त्याची प्रेयसी अर्थात चंगुनाबाईच्या मुलीकडून समजली. आपल्या प्रेमाला तिव्र विरोध होण्यास सुरुवात झाल्याची जाणीव दोघांना झाली. दरम्यानच्या काळात चंगुनाबाईने आपल्या मुलीचे लग्न लवकरात लवकर समाजातील दुसऱ्या मुलासोबत करण्याची तयारी सुरु केली. हा सर्व प्रकार पंडीत यास समजताच त्याने देखील प्रखर भुमीका घेण्यास सुरुवात केली. जर आपली प्रेयसी आपली होत नसेल तर अन्य कुणाचीही होणार नाही अशा रितीने तो तिच्याशी वागू लागला. हा प्रकार चंगुनाबाईला देखील समजला. आपल्या मुलीच्या लग्नात पंडीत आडकाठी आणेल याची चंगुनाबाईला जाणीव झाली. त्यामुळे तिने आता टोकाची भुमीका घेण्याचा निर्णय घेतला. तिच्या पहील्या पतीचा विलास प्रथम गावंडा नावाचा मुलगा होता. विलास हा पालघर जिल्हयाच्या मोखाडा तालुक्यातील बोटोशी येथील रहिवासी होता. पंडीतचा कायमचा काटा काढण्याचा प्लान तिने विलास सोबत बोलून दाखवला. आपल्या मुलीचे लग्न सुरळीत पार पडावे व त्यात पंडीतचा त्रास नको असा तिचा विचार होता. त्यातून तिने पंडीतला या जगातून कायमचे संपवण्याचा कुविचार मनाशी केला. विलासचा देखील दोघांच्या प्रेम प्रकरणास विरोध होता. पंडीत यास पार्टी देण्याच्या बहाण्याने लांब कुठेतरी घेवून जायचे व तेथेच त्याची हत्या करण्याचा प्लान विलासने आखला. याकामी त्याने त्याचे साथीदार तयार केले. कैलास जेठू फसाळे, प्रकाश नवसू झुगरे, राजू रामदास ठोंबरे या तिघांना त्याने तयार केले. २६ मे रोजी विलास गावंडा याने कैलास जेठू फसाळे, प्रकाश नवसू झुगरे, राजू रामदास ठोंबरे यांना सोबत घेतले. चौघांनी मिळून पंडीत यास पार्टीला जाण्याचे निमीत्त करत सोबत घेतले. त्याला पुर्णपणे गाफील ठेवण्यात आले. आपण पार्टीला जात नसून यमाच्या दारी जात आहोत याची किंचीतही कल्पना पंडीत यास आली नाही. २६ मे रोजी सर्व जण वैतरणा रस्त्यावरील ओंडली शिवारात पार्टी करण्याच्या बहाण्याने एकत्र आले. या ठिकाणी निर्जन ठिकाण बघून गाफील पंडीत खडके याचा गळा दाबून त्यास जिवानीशी ठार करण्यात आले. त्याची हालचाल पुर्णपणे बंद झाल्यानंतर त्याचा मृतदेह वन विभागाच्या जंगलात फेकून देण्यात आला. त्यानंतर चौघांनी तेथून पलायन केले. दुसरा दिवस उजाडला तरी देखील पंडीत घरी परत आला नाही. त्यामुळे त्याच्या आईवडीलांना काळजी लागली. एकामागून एक दिवस जात होते. सात दिवस उलटून गेले तरी देखील पंडीत घरी आलाच नाही. दरम्यानच्या काळात पंडीतच्या आई वडीलांनी त्याचा सर्वत्र शोध सुरुच ठेवला होता. अखेर १ जुन रोजी पंडीतच्या आईवडीलांनी इगतपुरी पोलिस स्टेशन गाठले. इगतपुरी पोलिस स्टेशनचे पो.नि. अशोक रत्नपारखी यांना भेटून त्यांनी आपल्या मुलाच्या बेपत्ता होण्याची व्यथा कथन केली. इगतपुरी पोलिस स्टेशनला या प्रकरणी १३/२० या क्रमांकाने पंडीतच्या बेपत्ता होण्याची मिसींग दाखल करण्यात आली. या मिसींगचा तपास पो.नि. अशोक रत्नपारखी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आला. इगतपुरी तालुक्याच्या तळेगाव शिवारातील कातोरेवाडी परिसरातील वन विभागाच्या निर्जन ठिकाणी पंडितचा मृतदेह पडून होता. या मृतदेहाची दुर्गधी परिसरात पसरत होती. या कालावधीत पशुपक्षांनी त्याच्या मृतदेहाचे लचके तोडण्यास सुरुवात केली होती. त्याचा केवळ पाय व कपडेच कुजलेल्या अवस्थेत जेमतेम राहिले होते. अखेर ११ जून रोजी हा कुजलेला मृतदेह परिसरातील लोकांच्या नजरेस पडला. या घटनेची माहिती मिळताच घोटी पोलिस स्टेशनचे स.पो.नि. जालिंदर पळे यांनी आपल्या सहका-यांसह घटनास्थळी भेट दिली. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलिस अधिक्षक आरती सिंग, अप्पर पोलिस अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर, उप विभागीय पोलिस अधिकारी अरुंधती राणे तसेच इगतपुरी पो.स्टे.चे पो.नि. अशोक रत्नपारखी यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.जालिंदर पळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढील तपास सुरु करण्यात आला. मृतदेहाचा तसेच घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. या प्रकरणी सुरुवातीला ५५/२० या क्रमांकाने घोटी पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. मयताच्या कपड्याच्या वर्णनाच्या तरुणाची कुठे मिसींग दाखल आहे का याची तपासणी करण्यात आली. १ जून रोजी इगतपुरी पोलिस स्टेशनला मिसींग दाखल असल्याची नोंद आढळून आली. मिसींग मधील तरुणाचे व त्याच्या कपड्यांचे वर्णन जुळून येत होते. मिसींग दाखल करणाऱ्या युवकाच्या आईवडीलांना बोलावून त्यांना कुजलेला मृतदेह दाखवण्यात आला. त्या मृतदेहाचे कपडे व पायातील पादत्राणे बघून हा मृतदेह आपला मुलगा पंडीत ढवळू खडके याचा असल्याचे त्यांनी ओळखले. अशा प्रकारे मयताची ओळख पटली. मयतास कुणी मारले हा पोलिस तपासाचा पुढील भाग होता. मयताचे कुणासोबत काही वाद होते का? त्याचे गावात कुणासोबत प्रेम संबंध होते का? याची तपासणी करण्यात आली. तपासात कातोरेवाडी गावातील चंगुनाबाई गणपत मेंगाळ हिच्या मुलीसोबत मयत पंडीतचे प्रेमसंबंध असल्याची माहिती पुढे आली. दोघांच्या प्रेमसंबंधाला चंगुनाबाई व तिचा मुलगा विलास प्रथम गावंडा यांचा विरोध असल्याची माहिती समोर आली. दोघांना चौकशीकामी बोलावले असता त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. अकस्मात मृत्यूच्या चौकशीत सरकारतर्फे हे.कॉ. एस.एस.गोसावी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार घोटी पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा घोटी पोलिस स्टेशनला गु.र.न.७७/२० भा.द.वि.३०२, २०१, ५०६, १२० ब, ३४ नुसार चंगुनाबाई व तिचा मुलगा विलास यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आला. त्यांना १४ जून रोजी अटक करण्यात आली. दोघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना सुरुवातीला पाच दिवसांची कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान या गुन्हयात अजुन तिघांची नावे समोर आली. कैलास जेठू फसाळे, प्रकाश नवसू झुगरे, राजू रामदास ठोंबरे यांची नावे अटकेतील दोघांनी पोलिसांना कथन केली. त्यामुळे त्यांना देखील ताब्यात घेत अटक करण्यात आली. चंगुनाबाईचा मुलगा विलास याच्यासह त्याच्या इतर साथीदारांनी पोलिसांसमोर कबुल केले की आम्ही तळेगाव शिवारातील कातोरेवाडी वन विभागाच्या हद्दीत पंडीतला गळफास देवुन मारुन टाकले. त्यामुळे इतर तिघा संशयीतांना देखील अटक करण्यात आली. त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेल्या दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. सदर तपास पोलिस अधिक्षक आरती सिंग, अप्पर पोलिस अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर, उप विभागीय पोलिस अधिकारी अरुंधती रणे, इगतपुरी पो.स्टे.चे पो.नि. अशोक रत्नपारखी यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.जालिंदर पळे, सहायक फौजदार अनिल धुमसे, पो.हवालदार गोसावी, खैरनार, पोलिस नाईक गायकवाड, दोंदे, देसले, पो.कॉ.कासार, सानप, महिला पोलिस कर्मचारी ढाकणे, शिंदे, चालक हवालदार भालेराव यांनी परिश्रम घेत पुर्ण केला.

## दोघांच्या प्रेमात आडवी आली जात...

विवाह करत असल्याच्या घटना समोर येतात. परंतु या आंतरजातीय विवाहाला अथवा प्रेमाला त्यांचे कुटुंबीय साथ देतात असं नाही. आंतरजातीय तरुणावर किंवा तरुणीवर प्रेम केल्यामुळे त्यांचे कुटुंबिय त्यांना जिवे मारण्यासह मागे पुढे बघत नाहीत. पिंपरी-चिंचवड येथे अशीच एक घटना घडली असून दुसऱ्या जातीच्या तरुणानं आपल्या मुलीवर प्रेम केल्याचा राग धरून त्या तरुणाला जिवे मारल्याची घटना घडली आहे. पिंपरी चिंचवडमधील सांगवी परिसरात प्रेम प्रकरणाच्या रागातून तरुणाची निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. विराज जगताप असे या मृत तरुणाचे नाव असून आपल्या मुलीवर प्रेम करतो या रागातून एकाच कुटुंबातील सहा जणांनी मिळून या तरुणाला जीवे मारले. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड परिसर हादरून गेला आहे. दरम्यान पिंपळे गुरव या परिसरात विराज जगताप हा आपल्या आईसोबत राहत होता. विराज लहान असतानाच त्याच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्याची संपूर्ण जबाबदारी विराजच्या आईवर येऊन पडली. नवऱ्याच्या निधनामुळे खचून न जाता विराजच्या आईने त्याच्या सांभाळ केला आणि त्याला शिक्षण देऊन मोठंही केलं. अशातच विराजचं परिसरातील एका मुलीवर प्रेम जडले. तरुण वयात अनेक मुला-मुलींचे एकमेकांवर प्रेम जडते. त्याचप्रमाणे विराजचेही एका मुलीवर प्रेम जडले. त्या मुलीचेही त्याच्यावर प्रेम होते. याची माहिती मुलीच्या घरच्यांना मिळताच त्यांनी जोरदार विरोध केला. कारण विराज हा खालच्या जातीचा होता. आपण उच्च जातीचे आहेत. त्यामुळे त्याची लायकी तरी आहे का आपल्या मुलीशी विवाह करण्याची असं म्हणत मुलीच्या घरच्यांनी तिला आणि विराजला दम दिला. परत एकमेकांना भेटायचे नाही. पुन्हा जर एकत्र दिसलात तर तुमच्या दोघांनाही जिवीत सोडणार नसल्याची धमकी त्यांनी दिली. परंतु एकमेकांवर खूपच जीव जडल्यामुळे दोघही लपून छपून भेटत असत. याबाबतची खबर मुलीच्या वडिलांना लागली. त्यामुळे याचा राग डोक्यात घेऊन मुलीचे वडिल जगदिश काटे यांनी विराजला कायमचा धडा शिकवायचा असं ठरवलं. त्यानंतर काटे यांनी आपल्या कुटुंबातील आरोपी हेमंत काटे, सागर काटे, रोहित काटे, कैलास काटे आणि हर्षद काटे यांना सोबत घेऊन विराजचा पाठलाग करण्यास सुरुवात केला. अशातच गल्लीच्या बाजूनच जात दुचाकीवरुन विराज जात असल्याचं त्यांना पहावयास मिळाले. त्यानंतर या सर्व आरोपींनी टेम्पो घेऊन जगदीशचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. ७ जून रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास विराज जगताप हा आपल्या दुचाकीवरून जात होता. जगदिश काटे आपल्याला मारण्यासाठी आपला पाठलाग करत असल्याची कुणकूण विराजला लागली. त्यामुळे त्याने जोरात गाडी पळवण्यास सुरुवात केली. त्यावेळी आरोपींनी टेम्पोतून पाठलाग करून पिंपळे सौदागर येथील शिव बेकरीजवळ त्याच्या दुचाकीला धडक देऊन खाली पाडले. टेम्पोच्या धडकेमुळे विराज खाली पडला. त्यानंतर आरोपी हेमंत काटे, सागर काटे, जगदीश काटे, रोहित काटे, कैलास काटे आणि हर्षद काटे या आरोपींनी लोखंडी रॉड आणि दगड घेऊन विराजला बेदम मारहाण केली. 'तुझी लायकी आहे का माझ्या मुलीवर प्रेम करायची, तरी तू माझ्या मुलीवर प्रेम करतो', असं म्हणून आरोपी त्याच्या अंगावर थुंकले आणि लोखंडी रॉड विराजच्या डोक्यात घातला आहे. सहा आरोपींनी दगड आणि लोखंडी रॉडने विराजला बेदम मारहाण केली. बेदम मारहाणीमुळे विराज जागेवर बेशुद्ध पडला. विराज बेशुद्ध पडल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी जितेश वसंत जगताप (४४) यांनी फिर्याद दाखल केली आहे. तर हेमंत कैलास काटे, सागर जगदीश काटे, कैलास मुरलीधर काटे, जगदीश मुरलीधर काटे या चौघांना अटक करण्यात आली असून, दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून रोजी रात्री दहाच्या सुमारास संशयित आरोपींनी जितेश जगताप यांना फोन करून 'विराजला पिंपळे सौदागर येथे मारले आहे, त्याला तेथून घेऊन जा,' असे फोन करून सांगितले. जितेश हे विराजच्या आईसह घटनास्थळी पोहोचले. त्या वेळी विराज रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. विराजने जितेश यांना सर्व हकिकत सांगितली. 'मुलीचे वडील, भाऊ यांनी टेम्पोने आपल्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्या सगळ्यांच्या हातातील दगड आणि लोखंडी रॉड पाहून मी घाबरून पळू लागलो. परंतु धाप लागल्यामुळे मी खाली पडल्यानंतर आरोपींनी लोखंडी रॉड आणि दगडाने आपल्याला मारहाण केली. माझ्या मुलीवर प्रेम करायची लायकी आहे का तुझी, असे म्हणून ते आपल्या अंगावर थुंकले,' असे विराजने जितेश यांना सांगितले. यानंतर लगेचजखमी विराजला खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. परंतु, सोमवारी दुपारी उपचारादरम्यान विराजचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी भादवी कलम ३०२/१४३, १४७,१४८, १४९ सह अनु.जाती जमाती कायदा कलम ३ (१) (आर), (एस) ३ (२) ३(२)(व्ही) ६ मपो.अधि. १९५१चे कलम ३७ (१) १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. तक्रार दाखल केल्यानंतर ८ जून रोजी मुख्य आरोपी आरोपी हेमंत काटे, सागर काटे यांच्यासह सहा जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.या प्रकरणी सहायक पोलिस आयुक्त श्रीधर जाधव तपास करीत आहेत. या घटनेनंतर शहरात एकच खळबळ उडाली आहे. अनेक संघटनांनी आरोपींविरोधात आंदोलन केले आहे. विराज याचा दोन महिन्यांपूर्वी वाढदिवस झाला असून, १९ वर्षापूर्वी त्याच्या वडिलांचे निधन झाले आहे. त्यामुळे त्याच्या आईवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यानंतर आता विराजच्या कुटुंबीयांनी सहाही आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. हल्लेखोरांनी त्याची अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याचं सांगत त्यांनी ही मागणी केली आहे. विराज जगतापच्या खुनानंतर सौदागरात तणावाचे वातावरण आहे.

## दारूच्या नशेत चौघांनी राडा केला...

लग्नाच्या पार्टीची गळ घातली. दोघे एकमेकांचे चांगले मित्र आहेत. मित्र दिपकची इच्छा पुर्ण करण्यासाठी त्याला सोबत घेवून मांसाहारी भोजन करण्यासाठी पंकज वडनेरे यांनी नियोजन केले. पंकजचे जळगाव शहरातील एस.टी.वर्कशॉप जवळ असलेल्या आसोदा मटण हॉटेलवर नेहमी जाणे येणे होते. पंकज वडनेरे यांची सासरवाडी असलेल्या आसोदा येथील प्रदिप चिरमाडे यांचे ते हॉटेल होते. त्यामुळे हॉटेल मालक प्रदिप चिरमाडे हे पंकजच्या ओळखीचे होते. त्या माध्यमातून दोघे एकमेकांना चांगल्या प्रकारे परिचीत होते. आसोदा येथील रहिवासी असलेले प्रदिप ज्ञानदेव चिरमाडे हे गेल्या सहा ते सात वर्षापासून जळगाव शहरातील एस.टी.वर्कशॉप चौकात मांसाहारी जेवणाची हॉटेल चालवत होते. मात्र लॉकडाऊन काळात प्रशासकीय आदेशानुसार त्यांनी पार्सल सेवा सुरु केली होती. लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर एका टेबलवर केवळ दोन ग्राहकांना बसवून ते सेवा देत होते. हॉटेलमधे मदतीसाठी त्यांचा मुलगा गिरीष, पुतण्या निखिल, दोन वेटर व चार महिला कर्मचारी अशा सर्वांच्या मदतीने हॉटेलचा डोलारा सुरु होता. १२ जूनचा दिवस उजाडला. हा दिवसच मुळात प्रदीप चिरमाडे यांच्यासाठी काळाकुट्ट तर पंकज व दिपक यांच्यासाठी काळा दिवस निघाला. आज पंकज वडनेरे व दिपक जगताप यांचे आसोदा हॉटेलवर जेवणाला जाण्याचे नियोजन झाले होते. एकंदरीत नियतीने घडवून आणलेले हे नियोजन एका दुखःद घटनेला आमंत्रण देणारे होते. घडणारी घटना अटळ असते असे म्हटले जाते. होणारी घटना कुणाला सांगून होत नसते हे देखील तितकेच खरे आहे. सकाळी अकरा वाजता प्रदिप चिरमाडे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने हॉटेल उघडले व सर्वजण कामाला लागले. या हॉटेलच्या बाजुला उमेश बियर शॉपी नावाचे दुकान आहे. या बियर शॉपीचा मालक उमाकांत कोल्हे आहे. हॉटेलच्या ओट्यावरुन या बियर शॉपीचे दर्शन सहजासहजी होते. याच परिसरातील चौकात एस.टी.वर्कशॉपजवळ महेंद्र महाजन या तरुणाची चहाची टपरी आहे. चहा विक्रेता महेंद्र महाजन आणि त्याचा मित्र प्रशांत कोळी हे दोघे पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार अर्थात हिस्ट्रीसिटर आहेत. प्रशांत कोळी याच्यावर शनीपेठ व एमआयडीसी पोलिसात विविध गुन्हे दाखल आहेत. महेंद्र महाजन व त्याचा प्रशांत कोळी या दोघांवर एमआयडीसी पोलिसात सरकारी नोकरावर हल्ला केल्याप्रकरणी एक गुन्हा दाखल आहे. या दोघांनी मिळून एका वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यास एमआयडीसी चौकात मारहाण केली होती. अशा प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेले दोघे मित्र सोबत रहात होते. प्रशांत कोळी याचे या चौकात महेंद्र महाजन याच्याकडे नेहमी येणेजाणे होते. त्यामुळे हॉटेल मालक प्रदिप चिरमाडे, बियर शॉपी मालक उमाकांत कोल्हे , चहा टपरी चालक महेंद्र महाजन व प्रशांत कोळी हे चौघे एकमेकांना चांगल्या प्रकारे ओळखत होते. महेंद्र महाजन व प्रशांत कोळी यांची दादागीरी या परिसरात सर्वश्रुत होती. १२ जून रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास पंकज वडनेरे व होमगार्ड दिपक जगताप हे दोघे जण त्याठिकाणी जेवण करण्यासाठी आले. सुरुवातीला काही वेळ सर्व काही सुरळीत सुरु होते. काही वेळाने प्रशांत भिवराज कोळी, महेंद्र अशोक महाजन व त्यांचा मित्र हेमंत संजय खैरनार असे तिघे चौकात एकत्र जमले. त्यांना आज काहीही करुन मद्याचा आस्वाद व तो देखील मोफत घ्यायचा होता. आपल्या दहशतीचा वापर करुन चौकातील उमेश बियर शॉपीतून बियरच्या बाटल्या घेण्यासाठी तिघे मित्र सरसावले. तिघा मित्रांच्या अंगात चांगलीच मस्ती संचारली होती. तिघांनी आपला मोर्चा उमेश बियर शॉपीच्या दिशेन नेला. जोरजोरात आरडाओरड व शिवीगाळ करुन त्यांनी परिसरात आपली दहशत माजवण्यास सुरुवात केली. उमाकांत कोल्हे या बियर शॉपी मालकाकडे जावून त्यांनी बियरच्या बाटल्यांची मागणी सुरु केली. उमाकांत कोल्हे यांच्याकडून सुरुवातीला त्यांना नकार मिळाला. त्यामुळे तिघांच्या दहशतीची तिव्रता अजून वाढली. त्यांनी उमाकांत कोल्हे यास मारहाण सुरु केली. त्यामुळे नंगे से खुदा डरे या उक्तीप्रमाणे घाबरलेल्या उमाकांत कोल्हे यांनी मुकाट्याने त्यांना दोन बियरच्या बाटल्या काढून दिल्या. त्या बाटल्यांचे पैसे मागण्याची हिंमत कोल्हे यांना झाली नाही. दहशतीच्या बळावर बियरच्या बाटल्या मिळाल्यामुळे त्यांची दादागिरी अजुनच वाढली. त्यांनी बियरच्या बाटल्या घेत हॉटेलच्या ओट्यावरच पिण्यास सुरुवात केली. तिघांच्या या प्रकारामुळे हॉटेलमधील कर्मचारी व ग्राहकांमधे भितीचे वातावरण निर्माण झाले. बियरच्या बाटलीचे झाकण उघडण्याऐवजी त्यांनी बाटलीच फोडून बियर पिण्यास सुरुवात केली. हा प्रकार हॉटेलमधील महिला कर्मचारी व ग्राहक तसेच हॉटेल मालक प्रदीप चिरमाडे बघत होते. तिघांच्या या प्रकाराकडे ग्राहक म्हणून आलेले पंकज वडनेरे व होमगार्ड दिपक जगताप हे दोघे बघू लागले. दोघे जण आपल्याकडे निरखून बघत असल्याचा संशय तिघा मित्रांना आला. अगोदरच त्यांच्या अंगात दादागिरीचे चैतन्य आले होते. शिवाय त्यांच्या हातात दहशतीच्या बळावर मोफत मिळालेल्या बियरच्या बाटल्या होत्या. आपल्याकडे पंकज वडनेरे व दिपक जगताप निरखून बघत असल्याच्या संशयातून तिघा मित्रांना राग आला. त्यांनी दोघांच्या तसेच इतर ग्राहकांच्या दिशेने फोडलेली बियरची बाटली फेकून मारली. यात पंकज वडनेरे व दिपक जगताप हे दोघे मित्र सापडले. पंकज वडनेरे यांना महेंद्र महाजन याने फुटलेली बियरची बाटली फेकून मारली. फुटलेल्या बाटलीची तिक्ष्ण किनार पंकजच्या गालावर लागली. त्यामुळे पंकजच्या गालावर खोल जखम झाली. दरम्यान प्रशांत कोळी व हेमंत खैरनार यांनी फुटलेली बाटली दिपक जगताप यास फेकून मारली. त्यात दिपकचा चेहरा व हात जखमी झाला. आता येथे थांबण्यात अर्थ नाही हे लक्षात घेत दिपक वडनेरे व दिपक जगताप यांनी तात्काळ दवाखान्यात धाव घेत वैद्यकीय उपचार सुरु केले. या घटनेमुळे तिघांना अजूनच चेव आला. त्यांनी दिसेल त्याच्या अंगावर हॉटेलमधील खुर्च्या फेकून मारण्याचा उद्योग सुरु केला. त्यामुळे हॉटेलमधे दहशत पसरली. भेदरलेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या मनात भिती निर्माण झाल्यामुळे त्यांनी गोंगाट सुरु केला. दरम्यान शेजारचा बियर शॉपी मालक उमाकांत कोल्हे भितीपोटी दुकान बंद करुन पळून गेला. अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत तिघे जण दहशत माजवत होते. तुमची हॉटेल कशी चालते तेच आम्ही बघतो. उद्यापासून हॉटेल बंद झाली पाहिजे. हॉटेल सुरु असल्याचे दिसता कामा नये असा त्यांचा एकंदरीत सुर होता. हॉटेल मधे सुरु असलेली दहशत थांबवण्यासाठी हॉटेल मालक प्रदिप चिरमाडे मध्यस्ती करण्यासाठी पुढे आले. हॉटेल मालक चिरमाडे आपल्याला रोखण्यासाठी पुढे आल्याचे बघून त्यांना अजूनच चेव आला. त्यांनी आपला मोर्चा चिरमाडे यांच्याकडे वळवला. फुटलेली बाटली त्यांनी चिरमाडे यांच्या दिशेने फेकून मारली. ती बाटली थेट चिरमाडे यांच्या गळयावर फेकली गेली. थेट गळयावर वार झाल्यामुळे प्रदीप चिरमाडे यांच्या गळ्याची नस कापली गेली. त्यात ते जखमी झाले. दरम्यान तिघांचा मित्र निलेश पवार त्याठिकाणी आलेला होता. आता अती झाल्याचे बघून निलेश पवारच्या दुचाकीवर ट्रिपल सिट बसून प्रशांत कोळी व हेमंत खैरनार तेथून पसार झाले. त्यानंतर लागलीच महेंद्र महाजन हा हॉटेलच्या ओट्यावरुन उडी मारुन मागील बाजूने पळून गेला. पळून जातांना त्याने प्रदिप चिरमाडे यांना पुन्हा दम दिला की उद्यापासून तुझे हॉटेल बंद करतो. उद्यापासून याठिकाणी दिसता कामा नये. प्रदिप चिरमाडे यांचा जिव वाचवण्यासाठी वेटर चेतन पवार याने त्यांना लागलीच आपल्या दुचाकीवर बसवून सरकारी दवाखान्यात नेले. त्यांच्या पाठोपाठ त्यांचा मुलगा गिरीष चिरमाडे हा देखील दवाखान्यात आला. वाटेतच प्रदिप चिरमाडे यांनी आपला जिव सोडला होता. रुग्णालयातील डॉक्टरांनी चिरमाडे यांना मयत घोषित केले.

या घटनेची माहीती मिळताच अतिरिक्त पोलिस अधिक्षक भाग्यश्री नवटके, सहायक पोलिस अधिक्षक डॉ. नीलाभ रोहन, शनीपेठ पोलिस स्टेशनचे पो.नि. विठ्ठल ससे, सहायक फौजदार दिनेशसिंग पाटील, हे.कॉ.हकीम शेख, संजय शेलार, रविंद्र पवार, रविंद्र पाटील, सलिम पिंजारी, अभिजीत सैंदाने, गिरीष पाटील, राहुल घेटे, राहुल पाटील, मुकुंद गंगावणे आदींनी घटनास्थळी तसेच रुग्णालयात धाव घेत कायदेशीर कारवाई व तपास सुरु केला. या प्रकरणी शनीपेठ पोलिस स्टेशनला महेंद्र महाजन, प्रशांत कोळी, हेमंत खैरनार व निलेश पवार या चौघांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गिरीष चिरमाडे यांच्या फिर्यादीनुसार गु.र.न.४४/२० भा.द.वि.३०२, ३०७, ५०६, ५०७, २६९, १८८, १५१ ब तसेच ३४ नुसार दाखल करण्यात आला. अतिरिक्त पोलिस अधिक्षक भाग्यश्री नवटके तसेच सहायक पोलिस अधिक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. विठ्ठल ससे व त्यांचे सहकारी सहायक फौजदार दिनेशसिंग पाटील, हे.कॉ.हकीम शेख, संजय शेलार, रविंद्र पवार, रविंद्र पाटील, सलिम पिंजारी, अभिजीत सैंदाने, गिरीष पाटील, राहुल घेटे, राहुल पाटील, मुकुंद गंगावणे आदींनी आपली तपासचक्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली. रात्रीच चोघा संशयितांना ताब्यात घेत अटक करण्यात आली. त्यांनी गुन्हयात वापरलेली दुचाकी तसेच तपासकामी गुन्हयतील रक्ताने माखलेले कपडे जप्त करण्यात आले. चौघा संशयितांना दुसऱ्या दिवशी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान चौघांनी आपला गुन्हा कबुल केला. चोघे संशयित सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

# पालघर जिल्ह्यातील कुपोषित बालके आणि गरोदर मातांना उत्तम दर्जाचा सकस आहार देण्यात येणार -जिल्हाधिकारी

**पालघर/प्रतिनिधी**



जिल्ह्यातील कुपोषित बालके तसेच गरोदर माता यांना भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत उत्तम दर्जाचा सकस आहार देण्यात येणार असून यासाठी लागणारा निधी वेळेत उपलब्ध करुन देण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

पहिल्या टप्यात अमृत आहार योजनेच्या लाभार्थींची प्रकल्प निहाय मागणी जनरेट करण्यात आली असून. दुसऱ्या टप्प्या तील निधी जलद गतीने वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. सध्यास्थितीत तालुका निहाय निधी वितरीत झाला आहे. शासन निर्णयानुसार सन २०२०-२१ मधील अर्थसंकल्पीय निधीच्या ३३% निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आल्या असल्याचे जिल्हाधकारी डॉ कैलास शिंदे यांनी सांगितले. कुपोषण निर्मुलन अंतर्गत टास्क फोर्स समितीची बैठक जिल्हाधकारी कार्यालय येथे व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली. यावेळी जिल्हा परषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेन्द्र वारभुवन, सहायक जिल्हाधिकारी सौरभ कटियार, श्री. नायर, उपविभागीय अधिकारी अर्चना कदम, स्वप्नील तागडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कांचन वानेरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी महिला व बालविकास अधिकारी राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

बाल उपचार केंद्र (उढउ) वाढविण्याची वाढविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. या केंद्र मध्ये आवश्यतेप्रमाणे बालकांना दाखल करण्यात येणार आहे. पावसाळ्यात सर्व्हेमध्ये आढळुन आलेल्या आजारी सॅम बालकांना सीटीसी मध्ये उपचार करण्यात यावेत अशी सूचना देण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले. आदिवासी भागातील कुपोषित बालके, गरोदर माता यांना पोषक आहार देण्याबाबत अंगणवाडी सेवीकांना आधुनिक पध्दतीने प्रशिक्षण देण्यात येणार असून, पालघर, वसई, डहाणु, तलासरी तालुक्यातील अंगणवाडी प्रकल्प यांचेशी संहिता संस्था, ग्राममंगल संस्था यांचा सामंजस्य करार झालेला आहे. सदर करारानुसार या तालुक्यातील सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे शैक्षणिक दृष्ट्या प्रशिक्षणआयोजित करण्यात येत आहे. वाडा तालुक्यातील अंगणवाडी प्रकल्प यांचेशी करार झालेला आहे. सदर करारानुसार या तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे शैक्षणिक दृष्ट्या प्रशिक्षणआयोजित करण्यात येत आहे.

विक्रमगड व जव्हार तालुक्यातील अंगणवाडी प्रकल्प यांच्याशी करार झालेला आहे. सदर करारानुसार या तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे शैक्षणिक दृष्ट्या प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. कोसबाड येथे अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना प्रशिक्षण देणारे शासकीय प्रशिक्षण केंद्र आहे. तसेच येथे ग्रामसेवकांना देखील प्रशिक्षण दिले जाते. कुपोषित बालकांचे वजन करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून अंगणवाडीतील बालकांचेहि वजन उंची पालकांच्या समक्ष घेण्याबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

## लातूर कंटेनमेंट झोनमधील गर्भवती मातेने दिला सुदृढ कन्येस जन्म



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरामध्ये कोरोना बाधित रुग्ण आढळून आल्यानंतर आसपासचा परिसर कंटेनमेंट झोन म्हणजेच बाधित क्षेत्र म्हणून घोषित केला जातो, त्या क्षेत्रातील नागरिकांना १४ दिवस कंटेनमेंट झोन बाहेर पडण्यास मज्जाव केला जातो. दरम्यानच्या काळात महानगरपालिकेच्या वतीने सर्व नागरिकांना आपल्या आवश्यक वस्तूंचा घरबसल्या पुरवठा केला जातो उपलब्ध करून दिल्या जातात तसेच नागरिकांची आरोग्य तपासणी केली जाते. शहरातील खाडगाव रोड येथील बाबा नगर परिसरात कोरोना बाधित रुग्ण आढळून आल्यानंतर महानगरपालिकेच्या वतीने सदरचा परिसर कंटेनमेंट झोन घोषित करून सील करण्यात आलेला होता. परंतु याच भागात राहणाऱ्या पूजा शिधापा धोत्रे या गर्भवती मातेस प्रसूतिवेदना जाणवू लागताच महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असता या गर्भवतीने मातेने सुदृढ कन्येस जन्म दिला. माता व कन्या दोघांचेही आरोग्य उत्तम असून त्यांना रुग्णालयातून घरी पाठविण्यात आले.लातूरचे महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांच्यासह नगरसेवक आयुब मणीयार, रघुनाथ मदने यांनी धोत्रे कुटुंबियांची भेट घेऊन नवजात कन्येस चांदीची पैंजण व मातेस पुष्पगुच्छ भेट देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कंटेनमेंट झोनमध्ये आवश्यक उपाययोजना राबवित असताना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने धोत्रे कुटुंबीयांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सेवेबद्दल कुटुंबीयांनी आभार व्यक्त केले.

## थोडक्यात वृत्तांत

### फेक बातमीवर जनतेनी विश्वास ठेऊ नये!

**पालघर :** पालघर जिल्हा पूर्णपणे बंद करण्याचे आदेश अशी बातमी सोशल मीडिया वर व्हायरल होत आहे. सदर बातमी फेक असून जनतेनी अशा बातमीवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे. या बातमी मुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याने जिल्हा माहिती अधिकारी यांना ज्या संबंधित वहिनीच्या बॅनरचा गैरवापर करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करणारे पत्र पोलीस अधीक्षक आणि ज्या मराठी वाहिनीच्या बॅनर चा गैर वापर झाला आहे त्यांनीही या बाबत पोलिसात तक्रार करावी असे पत्र देण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

### वाडा तालुक्यात शेती विषयक प्रशिक्षण संपन्न

पालघर : गोऱ्हे मंडळातील बावली, गुहीर, शेल्टे सुपोंडे, वसुरी (खु.) व वाडा मंडळातील वडवली आखाडा, दहीवली, बालीवली, परले कोनसई येथे मृग पंधरवाडा निमित्त शेतकरी मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले. सदर प्रशिक्षणात उपविभागीय कृषि अधिकारी, वाडा प्रविण गवांदे व तालुका कृषि अधिकारी वाडा माधव हासे व त्यांचे कार्यालयाचे मंडळ कृषि अधिकारी गोऱ्हे, एस.पी. इंगळे व मंडळ कृषि अधिकारी वाडा, श्रीमती एस.जी.गावडे यांनी मं.कृ.अ. कार्यक्षेत्रातील वर नमुद केलेल्या गावांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करून भात रोप वाटीका व्यवस्थापन, लागवडीच्या पद्धती व खते व्यवस्थापन, बांधावर तुर लागवड, मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड, गोपिनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजना, शेतकरी गटा मार्फत बियाणे व खते उचल, शेतकऱ्यासाठी असलेल्या पिक कर्ज व पिक विमा योजना बाबत उपविभागीय कृषि अधिकारी प्रविण गवांदे, तालुका कृषि अधिकारी हासे, मंडळ कृषि अधिकारी एस. पी. इंगळे व श्रीम. एम. जी. गावंडे यांनी मार्गदर्शन केले.

### मुरूड येथे वृक्षारोपन व औषधाचे वाटप

लातूर : काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष, खासदार राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या माध्यमातून ग्रामीण रुग्णालय मुरुड येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामीण रुग्णालयाचा अधिक गतीने विकास व्हावा व जास्तीत जास्त नागरिकांना या रुग्णालयातून दर्जेदार उपचार मिळवा या करिता आमदार धीरज विलासराव देशमुख प्रयत्न करत आहेत. खासदार राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय मुरुड च्या परिसरात झाडे लावण्यात आली. तसेच कोरोना आजाराच्या पार्श्र्वभूमी वर ग्रामीण भागातील नागरिकांची रोग प्रतिकार शक्ती वाढावी याकरिता आर्सेनिक अल्बम होमिओपॅथिक औषधाचे वाटप करण्यात आले. यावेळी लातूर जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष डॉ. दिनेश नवगिरे यांनी आर्सेनिक अल्बम या औषधाच्या सेवन विषयी सर्व आवश्यक ती माहिती नागरिकांना सांगून कोरोणा आजाराच्या साथीच्या काळामध्ये दक्षता घ्यावयाच्या गोष्टींची सविस्तर माहिती दिली. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. लक्ष्मण देशमुख, लातूर जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष डॉ. दिनेश नवगिरे, डॉ. सुरज माळी, राजेंद्र मस्के, चंद्रकांत मोरे, जगन चव्हाण, रवी अंधारे, संतोष देवकर, संजय अंधारे, मुरुड युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष उत्तम जाधव, महेश भोसले, समाधान गायकवाड, सोहित शेख, शामराव ईटकर, महेश ओझा, दिलीप इटकर, पांडुरंग माने इत्यादी यावेळी हजर होते.

### रुग्णालाच औषध विकत घेण्यास सांगितले!

लातूर : लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कोविड रुग्णाला महागडे औषध बाहेरून आण्याचीची शिफारस केल्याने वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी वैद्यकीय शिक्षण संचालकांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राज्यात कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे अनेक रुग्ण उपचारासाठी येत आहेत. या सर्व रुग्णांवर शासकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मात्र असे असूनही कोविड उपचारासाठी आवश्यक असलेले Tossilizumab हे महागडे औषध लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेच्या रुग्णालयातून रुग्णास बाजारातून विकत आणण्यास सांगण्यात आले. वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी या घटनेची गंभीर दखल घेतल्याने वैद्यकीय शिक्षण संचालकांनी अधिष्ठाता त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. लातूर येथे घडलेली ही बाब अतिशय गंभीर असून शासनाच्या आदेशाचे आणि धोरणाचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे अधिष्ठाता यांच्याविरुद्ध साथरोग अधिनियम तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमा नुसार शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण तीन दिवसात मागितले आहे. या घटनेमुळे रुग्णालयात उपचार घेत असलेल्या संबंधित रुग्णाची गैरसोय झाली असून अशा घटना पुनश्च घडणार नाहीत याची दक्षता घेण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी दिले आहे.

### साधूंच्या हत्या प्रकरणातील १७ आरोपींना कोरोना

वाडा : जगभरात कोरोनाचा कहर बरसत आहे त्याच बरोबर वाडा तालुक्यातही कोरोनाने प्रवेश केला असून तालुक्यात साठच्यावर रुग्ण कोरोना बाधित आहेत तर तालुक्यातील अनेक इमारती व गाव पाडे प्रतिबंधित केले आहेत. पालघर जिल्ह्यातील गडचिंचले येथे शेकडोंच्या घोळक्याने दोन साधू व एका चालकाची निर्घृण हत्या केली होती या हत्याकांडातील १७ आरोपींना वाड्यातील पोलीस ठाण्यात न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते, यांची कोरोना तपासणी केली असता १७ जणांना कोरोनाची लागण झाली असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांना पालघर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सोमवारी वाड्यातील एका ५५ वर्षीय रुग्णाचा ठाणे येथे उपचारा दरम्यान कोरोनामुळे मृत्यू झाला असल्याचे बोलले जात आहे. मात्र या बाबत शासकीय यंत्रणेकडून अधिकृत माहिती मिळाली नाही.तर वाड्यातील बुधावली येथील तरुणाचा कोरोनाच्या संसर्गाने मृत्यू झाला आहे.

## महेश अर्बन बँकेत आ.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते आयुर्वेदिक औषधाचे वाटप



**अहमदपूर/फिरोज शेख**

येथील महेश अर्बन बँकेत आमदार बाबासाहेब पाटील साहेब यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना आयुर्वेदिक औषधाचे वाटप करण्यात आले. श्री सदगुरू विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, कोल्हापूर संचलित श्री विश्ववती आयुर्वेद चिकित्सालय व संशोधन केंद्र द्वारा संशोधित 'रस माधव काढा' रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याच्या औषधाचे वाटप करण्यात आले. या औषधा बद्दलची सखोल अशी माहीती डॉ. संतोष देवकत्ते यांनी दिली. सद्य परिस्थितीत या औषधाची उपयुक्तता, नस्य, गंडूष, पंचकर्म चिकित्सा, पाचकाग्नि या विषयीची माहीती सांगितली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शिवानंद हेंगणे, महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे साहेब, बँकेचे सरव्यवस्थापक बी.के. क्षिरसागर साहेब, शाखा व्यवस्थापक अविनाश देशमुख, शाखा व्यवस्थापक विनोद चिलकेवार, तपासे एस.आर., सतीश पाटील., गुरव एस.टी., आमले एन.डी., चोपने एस.ए., पाटील जी.बी., मोरे आर.ए., विवेक शिंगडे, काटे टि. व्ही., चव्हाण आय.एम., कदम जी.व्ही., कोदळे के.एन. गंगथडे के.बी. वाघमारे एस.एम., विरेंद्र पवार, पडोळे डि.के. आलाटे पी.एल., बनसोडे आर.जी., पलमटे पी.एम., पवार बी.सी., भंडे जे.टी. उपस्थित होते.

## सलून सुरू झाले नाहीत तर आमच्यावर आत्महत्येची पाळी

### वसईत लाक्षणिक उपोषणाद्वारे नाभिक समाजाचा आक्रोश




**वसई/प्रतिनिधी**

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गेल्या ८० दिवसांपासून जो लॉकडाऊन सुरू आहे. त्यामुळे राज्यातील सर्व सलून बंद आहेत. परिणामी या व्यवसायावर पोट भरणाऱ्या लाखो नाभिक कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आहे. सरकारने परप्रांतीय मजुरांना मदत केली, पण इथला भूमिपुत्र असलेला नाभिक मात्र प्रशासनाला दिसला नाही. त्यामुळे या अन्यायाच्या विरूद्ध आता नाभिक समाज रस्त्यावर उतरला असून काल त्यांनी आपल्या मागण्यांसाठी वसई तहसील कार्यालयावर लक्षवेधी लाक्षणिक उपोषण करून तहसीलदारांना नाभिक समाजाच्या मागण्यांचे एक निवेदन दिले. नाभिक समाजाचा हा आक्रोश जर महाराष्ट्रभर पसरला, तर कायदा व सुव्यवस्था धोक्यात येऊन त्याचे गंभीर परिणाम सरकारला भोगावे लागतील असा इशाराच नाभिक समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. दरम्यान वसई येथील सलून असोसिएशन यांनीही या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे.

२५ मार्च पासून सुरु झालेल्या लॉकडाऊनमध्ये अत्यावश्यक सेवेतील दुकाने सोडून सर्व बंद आहेत. त्यात सलून सुद्धा बंद आहेत. केवळ सलूनाच नव्हे, तर गावोगाव फिरून केस, दाडी कापणारे आणि हातावर पोट असलेले नाभिक बांधव सुद्धा बेरोजगार झालेत. एकीकडे सरकार परप्रांतीय मजुरांना मोफत अन्न धान्य देतेय, त्यांना त्यांच्या गावी पाठवण्याची व्यवस्था करतेय. पण इथला गरीब नाभिक रोजगार बुडाल्याने उपाशी मारतोय, त्याला मात्र सरकार कसलीही मदत करायला तयार नाही. त्यामुळे त्याने जगायचे कसे?बरे अडिच महिन्यानंतर लॉकडाऊनमध्ये सवलती देऊन अनलॉक सुरू करण्यात आले. त्यात दारूची आणि इतर वस्तूंची दुकाने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली. इतर उद्योग धंदे सुरू झाले, मग सलूनवरच बंदी का? सलून मुळेच कोरोना पसरणार आहे का असा संतप्त सवाल नाभिक करीत आहे. आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात आता नाभिक रस्त्यावर उतरले असून त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात काही महत्त्वपूर्ण मागण्या केल्या आहेत. १) सलून दुकाने तत्काळ सुरू करणे बाबत अध्यादेश काढावा. २) सलून दुकानदार व कामगार यांची शासकीय स्तरावरून कामगार योजने अंतर्गत नोंदणी करून त्यांना तीन महिन्याची प्रतीमहा १० हजार रुपये मदत द्यावी. ३) या व्यवसायातील अनेकांनी आपला व्यवसाय हा बँकांकडून कर्ज घेवून सुरू केलेला असल्याने त्यांच्या कर्जाचे व्याज माफ करावे तसेच त्यांना बँकांकडून बिनव्याजी कर्ज मिळवून देण्याची व्यवस्था करावी. ४) फेसबुक सारख्या सोशल मीडियावर महिलांचा अपमान व नभिकांचा अपमान करणाऱ्या विवेक लांबे याच्यावर कठोर कारवाई करावी अशा प्रमुख मागण्या नभिकांच्या जीवा सेनेने केल्या आहेत. जीवा सेनेने केलेल्या लक्षवेधी लाक्षणिक उपोषणाला मोठा प्रतिसाद मिळाला असून जर नाभिकांचा हा आक्रोश सरकारच्या कानावर गेला नाही आणि त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले तर हा समाज आणखी मोठे आंदोलन करील असा इशाराही देण्यात आला आहे.

## नक्षलवाद्यांशी लढणाऱ्या योद्धाला केंद्राच सुरक्षा पदक जाहीर





**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

राज्यातील गडचिरोली या नक्षलवादी भागात कौतुकास्पद केलेल्या कामगिरीची दखल घेऊन केंद्र सरकारच्या वतीने उल्हासनगरचे पोलीस उपनिरीक्षक हर्षद काळे यांना सुरक्षा पदक जाहीर करण्यात आलंय.शहरात हर्षद काळे यांचं कौतुक केलं जातं आहे. केंद्र सरकारच्या वतीने पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना नक्षलवादी भागात खडतर सेवा पार पाडल्याबद्दल गृह विभागाच्यावतीने आंतरिक सुरक्षा सेवा पदक दिले जाते. हे पदक महाराष्ट्रात नक्षलग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर व गोदिया जिल्ह्याच्या अतिदुर्गम भागात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी भरघोष योगदान देणाऱ्या पोलीस अधिकार्यांना दिले जाते.

या नक्षलवादी भागात अतुलनीय कामगिरी केलेले व सद्या हिलाईन पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असलेल्या हर्षद काळे यांना केंद्र सरकारच्या वतीने सुरक्षा पदक जाहीर करण्यात आलं. नक्षलग्रस्त भागात जीवाची पर्वा न करता आमच्या सर्व टीमने मोठी धडक कारवाई केल्याचं सांगितल आहे.घडलेले अनेक प्रसंगाची आठवण झाली तर आजही अंगावर काटा उभा राहतो. हर्षद काळे यांना या अगोदर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. हिलाईन पोलीस ठाण्यात आज एक कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हूणन काम करत आहेत.

## भिवंडीत एका दिवसात १८० जण झाले बरे; तर ९७ नवे रुग्ण; ९ जणांचा मृत्यू

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीत कोरोनाबाधितांचा आकडा दिवसेंदिवस वाढत असतांनाच रुग्ण बरे होऊन कोरोनामुक्त होण्याच्या संख्येत देखील वाढ झाली आहे. शुक्रवारी शहरातील १४९ तर ग्रामीण भागातील ३१ असे तब्बल १८० रुग्ण एकाच दिवसात बरे झाले आहेत. दरम्यान शुक्रवारी शहरात एकाच दिवसात कोरोनाचे ६७ नवे रुग्ण आढळले असून ६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे तर ग्रामीण भागात ३० नवे रुग्ण आढळले असून ३ जणांचा मृत्यू झाला आहे. आज शहर व ग्रामीण भागात एकूण ९७ नवे रुग्ण आज आढळले आहेत. भिवंडी शहरात आतापर्यंत ७९४ रुग्ण आढळले असून त्यापैकी ४२१ रुग्ण बरे झाले आहेत तर ६४ रुग्णांचा आतापर्यंत मृत्यू झाला असून ३०९ रुग्णांवर सध्या उपचार सुरु आहेत. तर ग्रामीण भागात आतापर्यंत ३५१ रुग्ण आढळले असून त्यापैकी १४७ रुग्ण बरे झाले आहेत तर ८ रुग्णांचा मृत्यू झाला असून १९६ रुग्णांवर सध्या उपचार सुरु आहेत. दरम्यान शुक्रवारी आढळलेल्या ९७ नव्या रुग्णांमुळे भिवंडीतील शहर व ग्रामीण भागातील कोरोनाबाधित रुग्णांचा एकूण आकडा ११४५वर पोहचला असून त्यापैकी ५६८ रुग्ण बरे झाले आहेत तर ७२ रुग्णांचा मृत्यू झाला असून ५०५ रुग्णांवर सध्या उपचार सुरु आहेत.

## लाखांचे हरवलेले सोन्याची दागिने शोधून अक्कलकोट पोलिसांनी केले परत

**सोलापूर :** एका दुकानातून खरेदी केल्यानंतर हरवलेले सोने चांदीचे दागिने अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्याचे पोलिसांनी शोधून बोरोटी येथील महिलेला परत केल्याची घटना घडली आहे. गुरुवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास चांगुबाई श्रीमंत राठोड यांनी अक्कलकोट शहरातील एका सराफाच्या दुकानातून सोन्याचे मंगळसूत्र, कर्णफुले, पैंजण, जोडवे असे १ लाख ८ हजार रुपयांची दागिने खरेदी केली होती. तिच्याकडील सोने चांदीचे दागिने घाई गडबडीत बाजाराच्या मुख्य रस्त्यावर हरवले. त्यामुळे सदर ही महिला अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आली असता सदर घटनेचे गांभीर्य ओळखून अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक कल्लप्पा पुजारी यांनी तात्काळ डी.बी.पथकातील पोलीस कर्मचारी पोलीस नाईक चिंचोळकर, पोलीस कॉन्स्टेबल राठोड, शिंपाळे यांना शोधण्यासाठी पाठवून दिले. त्यांनी मुख्य रस्त्यावर बाजारपेठेत पाठ सदर कर्मचाऱ्यांनी आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यास सुरुवात केली. त्यांनी चंद्रकांत कटारे यांच्या दुकानात जाऊन चौकशी केली असता कटारे यांनी सदरचे सोने चांदीचे दागिने सापडले असल्याचे प्रामाणिकपणे कबूल केले व ते दागिने पोलिसांकडे परत दिले. त्याबद्दल पोलीस निरीक्षक कल्लप्पा पुजारी यांनी कटारे यांच्या प्रामाणिकपणाचे भरभरुन कौतक करून चांगुबाई राठोड यांना अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्यात बोलावून सोने चांदी दागिन्यांची खात्री करून दागिने त्यांना सुपूर्द करण्यात आली. हा एकदाच नाही की पोलीस निरीक्षक कल्लप्पा पुजारी नेहमीच पोलीस ठाण्याला आलेल्या नागरिकांची विचारपूस करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वारंवार प्रयत्नशील असतात.



22 TO 28 JUNE 2020 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 20/06/2020 7:38 PM Page 1



# चिनी हिंदी बाय बाय...!!

साम्राज्य विस्ताराची लालसा खूप भयंकर असते. पण ज्यांनी ज्यांनी साम्राज्य विस्तराच्या मोहापायी जगातील असहाय जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला, त्यांना पुढे त्याचे भयंकर परिणाम भोगावे लागले. मग तो हिटलरचा जर्मनी असो, मुसोलीनीचा इटली असो की महाराणी एलिझाबेथ हीचा ब्रिटन असो! या तिन्ही देशांना फार मोठी किंमत चुकवावी लागलीय. ब्रिटनची तर भारतासह अर्ध्या जगावर सत्ता होती. पण जसे जसे जगात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले, तस तसे या साम्राज्य वाद्यांना आपला गाशा गुंडाळावा लागला आणि जगाचा हा इतिहास नजरेसमोर असताना गेल्या सात आठ दशकांपासून आशिया खंडात कम्युनिस्ट चीनने ज्या पद्धतीने आपल्या शेजारी असलेल्या छोट्या देशांना लष्करी तात्त्कीचा धाक दाखवून त्यांचा भूभाग हडप करायला सुरूवात केलीय, ते पाहता चीनला रोखणे आवश्यक होते. चीन हा भारताचा शेजारी आहे आणि लडाख पासून डोकलंमपर्यंत तब्बल तीन हजार चारशे ८८ किमी लांब इतकी भारत चीन सीमा आहे. याच सीमेवरच्या तिबेट सारख्या छोट्या देशांचा सहजपणे घास घेण्याचा चीन प्रयत्न करतोय, तर हाँकाँगच्या बाबतीत चीनने ब्रिटन सारख्या मोठ्या देशालाही सहजपणे फसवून हाँकाँगची स्वायत्तता मोडून काढीत हाँकाँगला एक प्रकारे आपला गुलाम बनवून ठेवलेय आणि हे सर्व करीत असताना भारताच्या पूर्वोत्तर राज्यातील काही भाग हडपण्याचा चीन गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत आणि त्यावरूनच १९६२ साली भारत-चीन युद्ध झाले, पण त्यावेळी विश्वासघात करून चीनने युद्ध जिंकले आणि आज जो आक्साई चीनचा भूभाग आहे तो बळकावला आणि त्यानंतर सतत चीन कोणत्या ना कोणत्या मार्गाने पूर्वोत्तर सीमेवर तणाव निर्माण करीत आहे. आताही भारताने आपल्या ताब्यातील पूर्वोत्तर सीमेवर रस्त्याचे बांधकाम सुरू करताच चीनने त्याला विरोध सुरू केला आणि त्यातूनच १५ जूनच्या रात्री पुन्हा एकदा विश्वासघात करून आमच्या सैन्यातील पथकाला चर्चेला बोलावून त्यांच्यावर हल्ला केला. यात एका अधिकाऱ्यांसह आमचे २0 सैनिक शहीद झाले. आता एवढं सगळ होऊनही भारत सरकार जर चीन सोबत चर्चेचे घोडे नाचवणार असेल तर १९६२साली भारतात जे काँग्रेसचे सरकार होते. त्यात आणि आताच्या मोदी सरकारमध्ये फरक तो काय? वास्तविक १५ जूनच्या रात्री जी भयंकर घटना घडली. त्यानंतर भारताने चीन बरोबरचे चर्चेचे सर्व दरवाजे बंद करायला हवे होते आणि २०२० चा भारत हा १९६२ च्या भारतापेक्षा वेगळा आहे हे दाखवून द्यायला हवे होते, पण पुन्हा एकदा चीन बरोबर चर्चेची गुऱ्हाळ सुरू झाली. पंतप्रधान मोदी यांच्या सरकारने एकीकडे लष्कराला फ्री हेंड म्हणजेच बेधडक कारवाईची सुट दिलीय. पण दुसरीकडे डिप्लोमॅटिक स्तरावर चीनच्या विरोधात जी युद्ध पातळीवर मोर्चे बांधणी करायला हवी होती ती कुठे दिसत नाही. जगभर कोरोना व्हायरस परवल्याचा आरोपाखाली आज चीन आरोपीच्या पिंजऱ्यात आहे. यूरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील अनेक देशही चीनच्या विरोधात उभे आहेत. अमेरिकेने तर चीनला युद्धाची धमकी दिली आहे. पाकिस्तान आणि नेपाळ सारखे भिकारी सोडल्यास जगातला कुत्राही चीनच्या बाजूने नाही. त्यामुळे चीनवर काऊंटर ॲटेक करण्याची भारताला हीच मोठी संधी आहे, जर ही संधी भारताने गमावली तर भविष्यात चीन इतका शिरजोर होईल की आमच्या पूर्वोत्तर सीमेवर त्याला जे अपेक्षित आहे ते करण्यापासून चीनला भारत कधीच रोखू शकणार नाही. उलट चीनच्या शत्रूंची मदत घेवून जर भारताने आज चीनबरोबर युद्ध केलं आणि त्यात चीनचे प्रचंड नुकसान केले, तर चीन १00 वर्ष मागे ढकलला जाईल आणि आशिया खंडात भारताची निर्णायक ताकत वाढेल. परिणामी पाकिस्तान सारख्या भिकारी देशांची भारताकडे नजर उचलून बघण्याची हिम्मत होणार नाही. म्हणूनच भारताने ही संधी गमावता नये. दुर्दैवाने भारतात प्रत्येक गोष्टींकडे राजकीय चश्म्यातून पाहिले जाते. आज चीन विरूद्ध संपूर्ण देश एकजुटीने उभा असताना पंतप्रधानांनी बोलावलेल्या सर्व पक्षीय बैठकीत काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षांनी जी भूमिका घेतली ती संतापजनक होती. या संकटाच्या काळात सरकारला प्रश्न कसले विचारता. सरकारचे जर काय चुकले असेल तर त्याचा लेखाजोखा नंतर मांडता येईल किंवा त्याबाबत नंतर सरकारला जाब विचारत येईल. पण आता तरी चिनी संकटाच्या काळात सरकारच्या बाजूने उभे रहा! मात्र काँग्रेस जर या संकटाच्या काळातही राजकारण करणार असेल तर देशातील जनता त्यांना कदापि माफ करणार नाही. भारतातल्या लाल माकडांचे म्हणजेच कम्युनिस्टांचे सोडा त्यांना देशाच्या सुरक्षेपेक्षा कम्यूनिजम आणि चीन महत्वाचा वाटत आहे. पण त्यांना कोण विचारतोय आणि या देशात आता त्यांची संख्या मुठभर आहे. तेंव्हा कधीही ठेचता येईल, पण काँग्रेस हा देशातील सर्वात जुना आणि स्वातंत्र्य संग्रामाची पार्श्वभूमी असलेला मोठा पक्ष आहे. निदान त्यांनी तरी देश संकटात असताना वेगळी भूमिका घेऊ नये हीच लोकांची अपेक्षा आहे. आपले सैनिक तिथे निशस्त्र कसे गेले? त्यांना तिथे कोणी पाठवले? चीनने भारतात किती आणि कुठवर घुसखोरी केली आहे या सगळ्या प्रश्नांची लष्करी पातळीवर चर्चा होईल. सरकारने लष्कराला फ्री निर्णय घेण्याची मुभा दिली आहे ना, मग लष्कर बघेल ना काय करायचे आहे ते. यावेळी फक्त देशातील जनतेने देशातील सर्व राजकीय पक्षांनी खंबीरपणे लष्कराच्या पाठीशी उभे राहण्याची आवश्यकता आहे. १५ जूनच्या घटनेनंतर देशातील सर्व जनतेत चीन विरूद्ध संतापाची लाट उसळली आहे. जनता रस्त्यावर उतरून चीनचा निषेध करीत आहे. चिनी मालावर बहिष्कार टाकीत आहे. त्यामुळे काँग्रेसने या जनआंदोलनात सामील व्हायला हवे. भारत सरकारकडून चीनची आर्थिक नाकाबंदी करण्याचे जे प्रयत्न सुरू आहेत त्याला इथल्या राजकीय पक्षांनी बळ द्यायला हवे. कारण भारत हा चीनची सगळ्यात मोठी बाजारपेठ आहे आणि जवळपास ८५ टक्के भारताची आयात चीन मधून होते. त्या तुलनेत भारताकडून चीनला १६ टक्के दमण निर्यात होते हे गणित काँग्रेस सारख्या राजकीय पक्षांनी समजून घ्यावे, जर भारताने चीन बरोबरचे व्यापारी संबंध तोडले तर चीनचे काय होईल. तसे पाहता चीन आज अमेरिकेच्या तोडीस तोड महासत्ता बनला आहे आणि जगातील सर्वच देशांशी चीनचे व्यापारी संबंध आहेत. चीनने १५0 हून अधिक देशांना व्यापार उद्योगासाठी कर्ज दिलेय. जगभरातल्या अनेक देशांमध्ये चिनी कंपन्यांची गुंतवणूक आहे. त्यामुळे चीनची आर्थिक चेन तोडणे वाटते तितके सोपे नाही. त्यामुळे चिनी मालावर बहिष्कार टाकून चीनची आर्थिक कोंडी करणे हा काही निर्णायक पर्याय ठरू शकत नाही ते केवळ एक स्लो पोईझन ठरू शकेल आणि त्यामुळे त्याचे परिणाम ताबडतोब दिसणार नाही, म्हणूनच आजच्या तारखेला चीनच्या सर्व शत्रूंना एकत्र करून चीनची आर्थिक आणि लष्करी ताकत तोडणे हाच एकमेव पर्याय आहे आणि त्यासाठी युद्ध आवश्यक आहे. चर्चेची वांझोटी गुऱ्हाळ चालवून वेळ वाया घालवला, तर चीन अधिक प्रबळ होईल.

# धावते पाय आणि नवा रस्ता

**चिंतेचे क्षण जगण्याची उमेद घटव तील!**
**भीतीचे ब्रह्मराक्षस आयुष्यातून उठवतिल!**
**मृत्यूच्या हाताना किती दिवस चकवणार!**
**धावते पायच जगण्याचा मार्ग दाखवतील!**

जन्म आणि मृत्यू ही प्रत्येक माणसाच्या आयुष्याची दोन स्थित्यंतरे आहेत. त्यामुळे जन्माला आलेला प्रत्येक माणूस आज ना उद्या मरणारच आहे, पण मृत्यू अटळ असला तरी माणूस जगण्याची आशा सोडत नाही. जगण्यासाठी आयुष्यभर त्याचा संघर्ष सुरूच असतो आणि यालाच म्हणतात जीवन! म्हणूनच प्रत्येक माणसाने आशावादी असायला हवे. त्यासाठी संकटाचा मुकाबला करायला हवा आणि हा मुकाबला करताना जो संकटाचा काळातही काहीतरी वेगळं करण्याची संधी शोधत असतो तोच खरा माणूस! गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कॉमर्स ऑफ चेंबरच्या ९५व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात देशातील व्यापारी उद्योजकांना हेच सांगण्याचा प्रयत्न केला. आज केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात कोरोनाचे संकट आहे आणि जगातल्या ७५ लाख लोकांना कोरोना झालाय. त्यातल्या जवळपास तीन लाख लोकांचा मृत्यू झालाय. म्हणून काही जगाचा कारभार थांबलेला नाही. कोरोना आटोक्यात येत नाही म्हणून काही रुग्णालयातील डॉक्टरांनी कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करण्याचे थांबवले नाही. कोरोनाच्या भीतीमुळे लॉकडाऊनच्या माध्यमातून भलेही लोकांच्या दैनंदिनी जीवनावर काही प्रमाणात निर्बंध आलेले असले तरीही लोक त्यातून सावरण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव ओसरलेला नसला तरी हळुहळू जगभरातले लॉकडाऊन उठवले जात आहे. व्यापार उद्योग सुरू झालेत. कारण जगण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक असतात त्यापासून तुम्ही जास्त दिवस दूर राहू शकत नाही आणि कोरोनाच्या भीतीने आयुष्यभर कुणी स्वतःला घरात कोंडून ठेवू शकत नाही. कारण तसे केले तर जगण्याचे मार्गच बंद होतील. म्हणूनच कोरोनाला यापुढे न घाबरता माणसाने सुरक्षितता बाळगून घराबाहेर पडायला हवे. कामधंदा करायला हवा, जेणेकरून कुटुंबाचे आणि देशाचे अर्थचक्र सुरूच राहील. राहता राहिला प्रश्न कोरोनाचा, तर तो एक संसर्गजन्य रोग असून जगात सध्या युद्ध पातळीवर त्याची प्रतिबंधात्मक लस शोधण्यासाठी संशोधन सुरू आहे. त्यामुळे आज ना उद्या त्यावर औषध सापडेल आणि जगा समोरील संकट टळेल. पण कोरोनाचा भीतीने जर उद्योग धंदे बंद राहिले आणि उत्पादन ठप्प होऊन मार्केटमध्ये वस्तूंची टंचाई निर्माण झाली, तर महागाईचा प्रचंड आगडोंब उसळेल. तसेच भयंकर बेरोजगारी वाढेल आणि माणसाकडे पैसा नसला की मग जगण्यासाठी तो गुन्हेगारीकडे वळू शकतो. जर तसे झाले तर या देशात किती भयंकर परिस्थिती निर्माण होवू शकते याची कल्पनाही करता येणार नाही आणि म्हणूनच सरकारनेही आता कोरोनाच्या भीतीने लोकांना जास्त दिवस घरात डांबून ठेवण्याचे धोरण पुढे चालू ठेऊ नये. जूनच्या पहिल्या आठवड्यापासून जे अनलॉक सुरू केले आहे त्यात आता बदल करू नये. कारण कोरोनाच्या भीतीने देशाचे भयंकर नुकसान झाले आहे. त्यामुळे आणखी नुकसान नको. तसे पाहता मरण काय माणसाला चुकलेले नाही. आज जो कोरोनाच्या संकटातून वाचला आहे तो उद्या मोटार अपघातात किंवा हृदय विकाराच्या झटक्याने मारू शकतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास मरण कुणालाही चुकलेले नाही आणि चुकावताही येणार नाही. कारण कपाळावरच्या कर्माच्या रेषेवर विधात्याने जे काही लिहलेले आहे ते माणसाने स्वतःहून कपाळमोक्ष केला तरी त्याला बदलता येणार नाही. त्यामुळे कोरोनानेच मारायचं नशिबात असेल तर कितीही उपचार केले तरी माणूस वाचू शकत नाही आणि नेमकी हीच वस्तुस्थिती माणसाने लक्षात ठेवायला हवी.

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

त्यामुळे आता भारता पुरते बोलायचे झाल्यास आता भारतातील व्यापारी उद्योजकांनी आता कोरोनाच्या दडपणातून बाहेर येवून आपले उद्योगधंदे सुरू करायला हवेत. सरकारने या उद्योगधंद्यांना आर्थिक मदत तर करतील, पण सार्वजनिक परिवहन सेवाही सुरू करायला हव्यात. जेणेकरून लोकांना घराबाहेर पडून कामाधंद्याला जाता येईल. कारण उद्योगधंदे अधिक काळ बंद राहिले तर ते सुरू करणे अवघड जाईल. कारण इलेक्ट्रॉनिक मशिनरी अधिक काळ बंद राहिल्या तर त्यात अनेक तांत्रिक बिघाड होतात आणि त्या सुरू करण्यासाठी आणखी खर्च येतो. अगोदरच ७0 दिवस कारखाने बंद राहिल्याने उद्योजकांची आर्थिक स्थिती नाजूक बनलीय. अशावेळी पुन्हा सर्व नव्याने सुरू करताना त्यांची मोठी दमछाक होणार आहे. सरकारने जूनच्या पहिल्या आठवड्यापासून उद्योगधंदे सुरू करण्यास सशर्त परवानगी दिलीय, पण परिवहन सेवा बंद असल्याने लोकांनी कामावर जायचे कसे? सरकारने बेस्ट बसेस आणि एसटी बसेस सुरू केल्या आहेत, पण त्यांची संख्या कमी असल्याने तसेच रेलवे बंद असल्याने सर्व प्रवाशांचा भार एसटी आणि बेस्ट बसेसवर पडतोय आणि तो पेलणे त्यांना कठीण झाले. प्रवाशांची ही अडचण लक्षात घेऊन सरकारने एक तर लोकल ट्रेन सर्वांसाठी सुरु कराव्यात किंवा एसटी आणि बेस्ट बसेसची संख्या वाढवावी. जेणेकरून जे व्यापार उद्योगधंदे सुरू झालेत तिथे पोहचण्यासाठी कामगारांना अडचण येणार नाही. कारण जोवर कामगार येत नाहीत, तोवर हे उद्योगधंदे पूर्ण क्षमतेने चालणार नाहीत. हे सर्व लक्षात घेऊन आता सरकारने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी सामना करावा.

**मोबा.नं.: ७०२१४७६१५३**

# कोरोना नंतरचे शिक्षण!

'कोरोना' या तिन अक्षरी शब्दाने संपुर्ण जगाची झोप उडविली त्याला कारणही तसेच होते. कोरोना हा जिवघेणा आजार आणि जागतिक महामारी म्हणून २१ व्या शतकातील घातक रोग ठरला. कोरोनाने जगात केलेला विध्वंस आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या यांचा वेध घेत असताना प्रकर्षाने असे जाणवते की, कोरोनामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाला असून शिक्षणप्रणाली नव्या स्वरुपात स्थापित करणे ही काळाची गरज आहे त्या अनुषंगाने शैक्षणिक घटकांचा विचार करता कांही बदलांसह शिक्षण प्रक्रिया राबवणे अत्यंतीक गरजेचे आहे याचा सर्वंकष विचार करता असे जाणवते की डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधून कोरोना संसर्गाची सुरुवात झाली तेंव्हापासून जगभरातील २५३ देशांनी लॉकडाऊन केला त्यामुळे जगभरातील प्रवेशीत असलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ९८.६०% विद्यार्थ्यांचे म्हणजेच जवळपास १ अब्ज १९ कोटी विद्यार्थ्यांचे आणि भारतामध्ये जवळपास ३ कोटी विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद झाले होते त्यामुळे लॉकडाऊनच्या १६० दिवसानंतर जगभरातील २३ देशांनी शाळा सुरु केल्या तर १०० देश शाळा सुरु करण्याच्या तयारीत आहेत. यामध्ये फ्रान्स आणि इस्राईल या दोन देशांना शाळा सुरु करुन संसर्ग वाढल्याने शाळा पुन्हा बंद कराव्या लागल्या. असे असले तरी संपुर्ण जगभरातून कोरोना पूर्णपणे नष्ट झाल्यावर शाळा सुरु करण्याचा विचार करणे म्हणजे वास्तवाच्या अत्यंत विरुद्ध असेल म्हणून प्रादूर्भाव कमी असलेल्या रेड झोन किंवा कंटेन्मेंट झोन नसलेल्या ठिकाणी शाळा सुरु करण्याचा सकारात्मक विचार करायला हवा त्यानुसार १५ जुन किंवा पुढील काही कालावधीमध्ये शाळा पुर्ववत सुरु कराव्या लागतील कारण शाळा सुरु करण्यासाठी असलेले आंतरराष्ट्रीय संदर्भ, भारताची सामाजिक स्थिती आणि शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन यातून राज्यातील शिक्षण विभाग आणि संबंधित कर्मचारी बचावाची भुमिका स्विकारुन ०% रिस्क आणि १००% संरक्षण असा अवलंब करीत असल्याची टिका समाज माध्यमातून होऊ लागल्यामुळे शाळा सुरु करण्या बाबतीत सकारात्मक विचार संबंधित विभागाने करावा लागेल आणि पालकाच्या संम्मतीने शाळा सुरु करण्या बाबतीत पुढाकार घ्यावा लागेल. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला नसल्यामुळे शाळा जरी सुरु झाल्या तरी पालक आपल्या पाल्याला प्रत्यक्ष शाळेत पाठवतील याबाबत खात्री देता येत नाही त्यामुळे सद्यस्थितीत समाजाचा विश्वास वाढेल इतका बदल होईपर्यंत तरी सर्व वर्गाची शाळा सुरु करणे आवघड होईल त्यामुळे इयत्ता १ ली ते ५ वी मधील इयत्ता ५ वी चा शेवटचा वर्ग असल्यामुळे ५ वी चा वर्ग आठवडयातून फक्त १ दिवस भरवावा, इयत्ता ६ वी ते ८ वी मधील इयत्ता ८वीचा वर्ग शेवटचा असल्यामुळे ८ वी चा वर्ग आठवडयातून फक्त दोन दिवस भरवावा तर इयत्ता ९ वी ते १२ वी चे वर्ग मोठ्या मुलांचे असल्यामुळे सर्व वर्ग आठवडयातून तीन-तीन दिवस भरवावेत तसेच जे वर्ग प्रत्यक्ष शाळेत येऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी डिजीटल शिक्षणाच्या माध्यमातून दूरदर्शन, रेडिओ, ऑनलाईन शिक्षण यांच्या माध्यमांतून जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून जीवनमुल्यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था करावी लागेल. सध्याचे शैक्षणिक वर्ष हे महत्त्वकांक्षा पूर्ण करण्याचे वर्ष असणार नाही हे सर्वात आधी गृहीत धरावे लागेल आणि या शैक्षणिक वर्षाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थी आणि कर्मचारी यांचे आरोग्य हेच असले पाहिजे याचा अट्टाहास धरला गेला पाहिजे. मग यानुसार हे वर्ष शैक्षणिक वर्षे २०२०-२१ च्या पूर्व तयारीचे वर्षे, विद्यार्थी-पालक आणि समाज यांच्याशी तुटलेले नाते पुनर्रप्रस्थापित करण्याचे वर्षे, पुढील काळातील शिक्षण क्षेत्रातील विविध आव्हानाला सामोरे जाण्यासाठी शिक्षकामधील मुलभूत कौशल्य विकसीत करण्यासाठीचे हे वर्षे असेल. याच शैक्षणिक उद्दिष्टानुसार विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रव्रत्त करण्याऐवजी प्रेरित करण्याचे काम झाले पाहिजे आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे, परीक्षा घेणे, निकाल लावणे या नियमित बाबीच्या ऐवजी मुलांनी जीवनकौशल्य शिकावी, विषयातील मुलभूत संकल्पना स्पष्ट करुन घ्याव्यात आणि उपयोजनात्मक ज्ञान मुलांना देण्यावर भर देण्यात यावा.





**प्राचार्य गोविंद शिंदे**
मुख्याध्यापक, महाराष्ट्र विद्यालय, मजगे नगर, लातूर

आपल्याच राज्यातील एक घटना अशी होती की, कोरोना पॉझिटिव्ह असलेल्या प्रेगनन्ट महिलांचे अपत्य कोरोना निगेटिव्ह जन्मली, २२ दिवसाच्या नवजात बालकांनी कोरोनावर मात केली, दीड महिना, सहा महिने, एक वर्ष असे चौदा वर्षे वयोगटापर्यंतच्या अनेक बालकांनी कोरोनावर यशस्वीरित्या मात केली. राज्यात कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्या २४६५ व्यक्तींपैकी फक्त १ व्यक्ती चौदा वर्षे वयोगटाच्या खालची होती. इंग्लंडमध्ये कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्या ५०,००० व्यक्तीपैंकी फक्त ३ व्यक्ती चौदा वर्षे वयोगटाच्या खालच्या होत्या. फ्रान्समध्ये केलेल्या संशोधनानुसार कोरोना बाधित असलेल्या बालकांकडून संसर्ग होण्याचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. जगभरात दररोज उपासमारीमुळे ८००० पेक्षा जास्त आणि मलेरियामुळे शेकडो बालकांचा मृत्यू होतो. त्यातुलनेत कोवीड संसर्गातून बाधित होण्याचे किंवा मृत्यूचे प्रमाण अत्यल्प आहे.भारतासारख्या देशात शाळा बंद असल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढण्याचा धोका आहे. महाराष्ट्रातील पालघर, गडचिरोली, मेळघाट, चंद्रपुर यासारख्या अनेक वाडया, वसत्या, तांडे, डोंगराळ भाग, आदिवासी पाडे यासारख्या ठिकाणी मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढू शकते. शाळा बंद असल्यामुळे बालमजुरी, बालकावरच्या लैंगिक अत्याचाराचे प्रमाण, मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण आणि शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढण्याचा धोका निर्माण होत आहे.अंध, अपंग, मतिमंद, गतिमंद, विशेष गरजा असलेली बालके, भटक्या विमुक्तांच्या, अनुसुचित जाती जमातीच्या, आदिवासींच्या शासकीय वस्तीगृहात शिकणारी मुले यांचे शिक्षण बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील मुले लॉकडाऊनच्या काळात काही प्रमाणात घराबाहेर पडले परंतू मोठया शहरातील मुलांना २३ मार्च ते आजतागायत घराबाहेर पडता आले नाही त्यामुळे त्यांच्या शारिरीक, माणसिक आणि बौद्धिक विकासावर विपरित परिणाम होण्यास सुरुवात झालेली आहे.कांही मुलांना ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध झाला असल्यामुळे त्यांचा मोबाईलचा वापर वाढून त्यांना डोळे, हात, कान, मनगट, आणि हाताची बोटे यांच्या आजाराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध झाला असल्यामुळे शिक्षण व्यवस्था आणि शिक्षक यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊन ओपन स्कुलिंग किंवा होम स्कुलिंग सारख्या पर्यायांचा पालक प्राधान्याने विचार करायला लागले आहे. अशा परिस्थितीत शाळा सुरु न करणे म्हणजे ०% धोका आणि १००% संरक्षण या धोरणाचा अवलंब शिक्षण विभाग करत असल्याचा गैरसमज समाजात पसरण्यास सुरुवात होत आहे.

या वर्गाची शाळा सुरु झाल्यानंतर सुरुवातीच्या काही दिवसात गणित, इंग्रजी, विज्ञान ही विषय प्राधान्याने शिकवले जावेत आणि मराठी, इंग्रजी, हिंदी हे विषय दुसर्या टप्पयात शिकवले जावेत तर इतिहास, भुगोल, ना. शास्त्र, अर्थशास्त्र, कला, कार्यानुभव, क्रीडा यासारखे विषय सर्व परिस्थितीत पूर्व पदावर आल्यानंतर सुरुवात करावेत तसेच योगा, ध्यानधारणा, प्राणायाम, न्युट्रिशन या विषयाचा प्रामुख्याने अभ्यासक्रमात अंर्तभाव करुन मुलांची प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. हे विषय शिकवत असताना एकूण अभ्यासक्रमातील किमान २०% अभ्यासक्रम कमी करण्यात यावा आणि दोन वर्षाचा अभ्यासक्रम एकत्रित करुन तो अभ्यासक्रम दोन वर्षात पुर्ण करण्याची मुभा दयावी लागेल आणि शाळा भरण्याच्या वेळा, सुटण्याचा वेळा, तासिकेचा कालावधी याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार त्या त्या व्यवस्थापनाला द्यावे लागतील.

वर्षभरात एकूण किमान २२० दिवस शाळा किमान १३०० तासिका घेणे आजपर्यंत बंधनकारक होते पण सद्यस्थितीत याप्रमाणे कार्यक्रम राबविणे शक्य होणार नाही त्यामुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी १०० दिवस शाळेतून आणि १०० दिवस घरातून अभ्यासक्रम पूर्ण करण्याची मुभा देऊन ६०० तासिका शाळेतून व ६०० तासिका घरात देण्याची मुभा द्यावी लागेल तसेच परीक्षा पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल करुन पेन आणि पेपर नुसार केलेले मुल्यांकन गृहीत न धरता वर्षभर केलेल्या प्रकल्प, प्रात्यक्षिक, प्रश्नोत्तरे, सहभाग व इतर ॲक्टीव्हिटीनुसार मुल्यांकन करुन निकाल दयावा लागेल. हे सर्व करत असताना शालेय शिक्षण विभाग व आरोग्य विभाग यांची भुमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. ज्यामध्ये शालेय शिक्षण विभागाने सतत माहिती मागवणे, प्रशासन गतिमान न ठेवणे, विनाकारण काही प्रकरणातील निर्णय लवकर न घेणे, दप्तर दिरंगाई वाढवणे, शालेय स्वच्छतेच्या बाबतीत व्यवस्थापनाला आर्थिक मदत न करणे याबाबतीत खुप सकारात्मकपणे विचार करुन शासन सहकाराच्या भुमिकेत असले पाहिजे त्याचसोबत सार्वजनिक आरोग्य विभागाने शैक्षणिक संस्थांच्या समुपदेशकांची भुमिका बजावली पाहिजे जेणेकरुन विद्यार्थी-पालक-शिक्षक यांचा आत्मविश्वास वाढून शाळा, महाविद्यालय पुन्हा नव्या जोमाने, नव्या आत्मविश्वासाने आणि बदललेल्या नियमावलीने पुढे जाण्यास सक्षम होतील आणि खर्या अर्थाने पुन्हा एकदा राज्याचे 'मिशन बिगीन अगेन' सुरुवात होईल...!

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. २२ जून २०२० ते रविवार दि. २८ जून २०२० | लातूर/मुंबई/पालघर | www.crimesandhya.com 

# विरारमध्ये अत्यावश्यक सेवेतील बेस्ट कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी धावले 'जय जवान' मंडळाचे कोरोना योद्धे





**विरार/प्रतिनिधी**

सध्या जगभर पसरलेल्या कोरोनाच्या संकटात ज्याप्रमाणे कोरोन योद्धे बनून वैद्यकीय कर्मचारी जीवावर उदार होवून काम करीत आहेत. त्याच प्रमाणे काही सामाजिक संघटनाही पुढे येवून लोकांना मदत करीत आहेत. लॉकडाऊनमध्ये रोजगार गेलेल्या गरीब कामगारांना अन्नधान्याचे वाटप करण्यापासून ते अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना जेवण, चहा, नष्टा आणि इतर मदत करण्याचे कामही काही सामाजिक संघटना करीत आहे. विरार मधील बहुजन विकास आघाडी पुरस्कृत जय जवान मंडळानेही लॉकडाऊनच्या काळात अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी सुरु केलेल्या बेस्ट बसेसच्या वाहक-चालक आणि अधिकारी वर्गाला मोठी मदत केली. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बेस्टच्या कर्मचाऱ्यांकडून विरार पुर्व येथील बस स्टँडवर जय जवान मंडळाचे अध्यक्ष झहीर शेख व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

सरकारने लॉकडाऊनमध्ये अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी बेस्टच्या खास बसेस सुरु केल्या होत्या. विरार रेल्वे स्थानकाजवळ त्याचा बस स्टॉप ठेवण्यात आला होता. बेस्टची हि सेवा २४ तास सुरु होती. यावेळी त्या ठिकाणाहून सुटणाऱ्या आणि तेथे येणाऱ्या बेस्ट बसेसच्या वाहन चालक वाहक तसेच इतर कर्मचाऱ्यांना चहा, नष्टा, जेवण तसेच त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना सॅनिटाइझर, मास्क आदी देण्याचे काम विरार पुर्व येथील जय जवान मंडळाने केले. इतकेच नव्हे तर बसेससाठी रांगेत उभ्या राहणाऱ्या प्रवाशांनाही मास्क आणि सॅनिटाइझर देण्याचे तसेच रांगेत सोशल डिस्टन्स पाळण्याबाबतचे मार्गदर्शन जय जवान मंडळाचे कार्य करते करीत होते. त्यांचे हे काम कोरोन योध्या प्रमाणेच होते.

कारण या सर्व लोकांमध्ये मिसळून काम करताना त्यांनाही कोरोनाची लागण होण्याचा धोका होता, पण त्याची परवा न करता त्यांनी हे काम केले. तसेच या काळात वसई विरार महापालिकेच्या नगरसेविका तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती माया चौधरी यांनी पालिकेकडे पाठपुरावा करून बेस्टच्या वाहक चालक आणि अधिकारी वर्गाला महापालिकेच्या सभागृहात रात्रीच्या वेळी झोपण्याची व्यवस्था करून दिली होती. दरम्यान लॉकडाऊनच्या काळात जय जवान मंडळाने गरिबांना अन्नधान्याचे किट पुरवले. रमझान ईदच्या दिवशी गरीब मुस्लीम बांधवाना शिरकुर्मा बनवण्यासाठी दुध व शेवईचे वाटप केले. तसेच या काळात रक्तदान शिबिरांचे आयोजन केले.

मात्र आता सरकारने अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी लोकल ट्रेन सुरु केल्या आहेत. त्यामुळे बेस्ट बसेस वरचा ताण कमी झालाय. म्हणूनच हे सुद्धा एक प्रकारचे कोरोना योद्धे आहेत. म्हणूनच बेस्ट कर्मचाऱ्यांच्या वतीने विरार आर.जे. नगर येथे जय जवान मंडळाचे अध्यक्ष झहीर शेख व त्यांचे सहकारी फिरोज शेख, हुसेन शेख, बिस्मिल्ला खान, ताहीर साठे, आसिफ शेख, नाजू तडवी, बिलाल शेख, लाल खान यांचा सत्कार करण्यात आला.

## डॉक्टराकडून नर्सवर हॉस्पिटलमध्येच बलात्कार; नर्सचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**




सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा शहरातील हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या एका २७ वर्षीय नर्स वर डॉक्टराने वारंवार बलात्कार करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल मंगळवेढ्यातील डॉक्टराला पोलिसांनी जेरबंद केले आहे. मंगळवेढ्यातील एका हॉस्पिटलमधील नर्सला तू मला खूप आवडतेस तुला आयुष्यभर सांभाळेंन, असे अभिवचन देऊन तिच्याशी अनैतिक संबंध ठेवून नंतर तिचा गर्भपात केल्यावरून संबंधित पिडिताने अंगावर पेट्रोल ओतून जाळून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी येथील समर्थ हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत प्रभाकर नकाते (मुरलीधर चौक, मंगळवेढा) यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करून जेरबंद केले आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की, यातील नर्स ही मंगळवेढा शहरातील मुरलीधर चौकात असलेल्या समर्थ हॉस्पिटल येथे दोन वर्षांपासून कामास असून, कामाला लागल्यानंतर एक वर्षांनंतर डॉ.प्रशांत नकाते यांनी हॉस्पिटलमध्ये कोणीही नसताना, तू मला खूप आवडतेस, मी तुझ्यावर प्रेम करतो, माझे लग्न झाले आहे, तरी मी तुला आयुष्यभर सांभाळीन असे म्हणून पीडित नर्सला आमिष दाखवून आरोपी डॉक्टराने हॉस्पिटलमध्येच वारंवार शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर पीडितेचे कामाचे पगार डॉक्टर आरोपी देत नसल्याने तेथून काम सोडून, दुसरीकडे काम पहात असताना आरोपीने पीडितेस कुठेही काम मिळवून दिले नाही. ५ जून २०१९ ते २६ एप्रिल २०२० पर्यत आरोपीने शारीरिक संबंध वारंवार ठेवल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी दोन वेळा पीडित नर्स गेली होती. मात्र तिच्या आईने व भावाने तक्रार दिल्याने बदनामी होईल, असे सांगितल्याने तक्रार दिली गेली नाही. १८ जून रोजी सकाळी पीडित नर्स आरोपी डॉ.प्रशांत नकाते यांना भेटण्यासाठी गेली होती, परंतु अन्यायाची खंत मनात असल्याने अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेतले. पेटल्याचे पाहून आरोपी डॉ.प्रशांत नकाते व हॉस्पिटलमधील रुक्मिणी जाधव यांनी अंगावर पाणी टाकून आग विझवली, गंभीर भाजलेल्या परिस्थितीत पोलिसांनी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. दरम्यान पीडितेस दिवस गेले होते. आरोपीने जबरदस्तीने गोळ्या देऊन गर्भपात करण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच या गोष्टीची वाच्यता केल्यास नर्सच्या कुटुंबाना मारून टाकण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित बामणे व पोलीस कर्मचारी करीत आहेत.

## सोलापूर शहर पोलिसांकडून १३ घरफोड्या उघडकीस

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर शहर पोलिसांनी दोन चोरट्यांना जेरबंद केले असून त्यांनी केलेल्या १३ चोऱ्या, घरफोडी उघडकीस आले आहेत. या दोघांकडून २० तोळे सोने, १३ तोळे चांदी व रोख रक्कम असे ७ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. बाळू देविदास काळे (४०), संदीप प्रल्हाद चव्हाण (३४) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. सोलापूर शहरांमध्ये मागील काही दिवसात घरफोडीचे प्रकार घडले होते. याबाबत विविध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाले होते.

त्या अनुषंगाने सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना ही गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पथक अभिलेखावरील गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी गस्त घालत होते. त्यावेळी दोघे आरोपी मोटारसायकलवरून लक्ष्मी मंदिर चौक विडी घरकूलमार्गे चोरलेले सोने चांदीचे दागिने विक्रीकरिता सराफ बाजारात आणणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तेथे पोलिसांनी सापळा रचून पकडले. बाळू काळे व संदीप चव्हाण यांच्या ताब्यातील रोख रक्कम, दागिने तसेच दुचाकीच्या डिक्कीमधील बॅटरी, हातोडा, स्क्रू ड्रायव्हर, पक्कड व दोन हातमोजे असे साहित्य सापडले.

त्यांची कसून चौकशी केली असता, त्या दोघांनी व त्याच्या आणखी एक साथीदार अशा तिघांनी मागील महिन्यात मोटारसायकल वर येऊन मंत्री चंडक नगर, हैदराबाद रोड येथील बंद घर फोडून त्यातील चोरलेले दागिने विक्रीसाठी नेत असल्याचे सांगितले. त्यांनी १३ घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. या दोघांकडून २० तोळे सोने, १३ तोळे चांदी व रोख रक्कम असा ७ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त अभय डोंगरे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे तसेच पोलीस कर्मचारी दिलीप नागटीळक, इमाम इनामदार, विजय वाळके, संदीप जावळे, मंगेश भुसारे, संतोष येळे, अय्याज बागलकोटे, गणेश शिंदे, अश्रूभान दुधाळ यांनी कारवाई केली आहे.

## लातूरात भरदिवसा चोरट्यांनी १४ लाख ७५ हजाराची बॅग लुटली

**लातूर** : बँकेत आरटीजीएस करण्यासाठी १४ लाख ७५ हजार ६०० रूपयांची घेवून जात आसलेल्या व्यापाऱ्याला दिवसाढवळ्या आडवून गळयावर सुरा लावत रोख रक्कमेची बॅग पळविल्याची घटना लातूर शहरातील स्क्रॅप मार्केट जवळील गोरक्षण परीसरात घडली आहे. या घटनेने व्यापाऱ्यात भितीचे वातावरण तयार झाले असून चोरट्यांनी ही धाडसी लुट करून गांधी चौक पोलिसांना आव्हान दिले आहे. या प्रकरणी व्यापाऱ्याने दिलेल्या फि र्यादिवरून गांधी चौक पोलिस ठाण्यात अज्ञात लूटारू विरोधात गुन्हा दाखल करण्सात आला आहे.

याबाबत पोलिस सुत्राकडून मिळालेली माहीती अशी की, लातुरातील स्क्रॅप मार्केट जवळील गोरक्षणच्या कोपऱ्यावर भर दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास व्यापारी हितेशकुमार धनजीभाई पाबारी (रा. मोतीनगर लातूर) हे बँकेत आरटीजीएस करण्यासाठी १४ लाख ७५ हजार ६०० रूपयांची बॅग घेऊन जात होते. दरम्यान हितेशकुमार पाबरी हे शहरातील स्क्रॅप मार्केट जवळील गोरक्षण परीसरात येताच एकाने त्याना आडविले तर दुसऱ्याने त्याच्या गळ्यावर कोयता ठेवून जिवे मारण्याची धमकी दिली. पाबारी याने पैसे घेवून जा पण मला मारू नका अशी भूमिका घेवून प्रतिकार केला नाही. दोघा जणांनी सुमारे १५ लाख रूपयांची ही बॅग दिवसाढवळ्या लुटून नेली. हितेशकुमार धनजीभाई पाबारी हे कमीशन एजंट म्हणून काम करतात असे सांगण्यात येते.रोज ते बाजारातून पैसे गोळा करतात व कव्हा रोड मार्केट यार्ड रोडवर असलेल्या ओरियंटल बँकेमध्ये आरटीजीएस करण्यासाठी जातात. १७ जून रोजी नेहमीप्रमाणे ते मोटारसायकली वरून गंजगोलाई, शिवाजीरोड व बाजारातील वेगवेगळ्या व्यापाऱ्यांकडील रकमा बॅगेमध्ये घेवून ते मार्केट यार्ड रोडवर असलेल्या बँकेकडे निघाले पण गुळ मार्केट चौकातून जाण्यासाठी गर्दी आहे म्हणून ते शिवाजी रोड, स्क्रॅप लाईन, मंठाळेनगर, शिवनेरी गेट असे जाण्यास निघाले. चोरट्याला बहुधा ताबारी यांचा व्यवहार माहित असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. तसेच पाबरी यांच्यावर चोरट्यांनी पाळत ठेवून हा लुट केल्याचा देखील पोलिसांकडून संशय व्यक्त केला जात आहे. हितेशकुमार पाबरी यांचाजाण्याचा मार्ग निश्चित असल्याने त्यांना स्क्रॅप मार्केटच्या एका टोकाला असलेल्या गोरक्षणच्या समोर एका तरूणाने आडवून दुसऱ्याने कोयता गळ्यावर ठेवला व बॅग लंपास केली हे दोघे चोरटे त्याच ठिकाणी दबा धरून बसले असावेत अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. अचानक घडलेल्या या भयानक घटनेने लातूर शहरातील व्यापारी वर्गात व नागरिकांत चिंता पसरली आहे. या प्रकरणी हितेशकुमार पाबरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गांधी चौक पोलिस ठाण्यात गुरनं २४१/२०, कलम ३९२,३४१,३४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि वाघमारे करीत आहेत.

## कोरोना महामारीला प्रतिबंध घालण्यासाठी आणखी, कठोर निर्णय घ्यावे लागतील -संभाजीराव निलंगेकर

**देवणी/शकिल मनियार**



कोरोना महामारीच्या प्रतिबंधासाठी तालुक्यातील प्रशासनाने केलेले कार्य उल्लेखनीय आहे.यामुळेच आजतागायत तालुका कोरोनामुक्त आहे. त्यामुळे या सर्व योध्याचे विशेष अभिनंदन करून यापुढील येणारे दीवस आनखीन भयानक असु शकतील त्यामुळे या (कोविड१९) कोरोना सारख्या महामारीला प्रतिबंध घालण्यासाठी आणखी कठोर निर्णय घ्यावे लागतील. असे मत गाव स्वास्थ्य व सुरक्षा मिशन, एक नविन पाऊल देवणी येथे घेण्यात आलेल्या कार्यशाळेत निलंगा मतदार संघाचे आमदार माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यानी धनुरे मंगलकार्यालयात मार्गदर्शन करताना म्हणाले हि सभा सामाजिक अंतर ठेऊनच पार पडली.

यावेळी या कार्यशाळेस विषेश उपस्थितित खासदार सुधाकर श्रंगारे, देवणी तालुका अध्यक्ष काशिनाथ गरीबे, जिल्हा परिषद सदस्य, रामचंद्र तिरूके, पृथ्वीराज शिवशिवे, प्रशांत पाटील जवळगेकर, गोविंद चिलकुरे, चेअरमन दगडोजीराव सोळूंके, पंचायत समिती सभापती चित्रकला धनाजी बिरादार, उपसभापती शंकरराव पाटील तळेगावकर, जेष्ठ नेते हावगीराव पाटील, मनोहर पटणे, नगराध्यक्ष वैजिनाथ अष्टूरे, नगरसेवक बाबूराव इंगोले, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बालाजी बिरादार, बसवराज पाटील, पंचायत समिती माजी सभापती सत्यवान कांबळे, माजी उपसभापती तुकाराम पाटील, निलंगा उपविभागीय अधिकारी विकास माने,तहसीलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, वैद्यकीय अधिकारी निळकंट सगर, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक ,तालुक्यातील सरपंच सर्वच अधिकारी पदाधीकारी वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, तालुका प्रशासनातील तहसिल, आरोग्य विभागाबरोबरच ग्रामस्तरावरील सरपंच, ग्रामसेवक, पोलिस पाटील, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती, काही पोलीस याचबरोबरच विशेष म्हणजे अँटी कोरोना फोर्सच्या करड्या नजरेमुळे परजिल्ह्यातुन, परराज्यातुन विदेशातुन येणाऱ्या व्यक्तीवर पाळत ठेवत होम क्वारंटाईन, अलगीकरण ठेवण्याच्या सुचना वेळोवेळी संबधिताना दिल्या. शिवाय सर्वानी सामाजिक अंतराचे शासनाच्या आदेशाचे पालन केले. याकामी या लढ्यात जिवाची पर्वा न करता दिलेल्या भरीव योगदानामुळेच आजपर्यंत देवणी तालुक्यात एकही कोरोना रूग्ण आढळला नाही. आपल्या जिल्ह्यात सुरूवातील फक्त ८ रूग्ण होते तेव्हा आपन शासन आदेशाचे काटेकोरपणे पालन केले आणि आज जिल्ह्यात २०८ रूग्ण उपचार घेत आसतान मात्र आपन प्रचंड बेफीकीरपणे वागत आहोत. लॉकडाउन काळात अविरत काम करून शासकिय यंत्रनेवर प्रचंड तान आला असून आता ग्रामस्तरावर गाव स्वास्थ्य व सुरक्षा मिशन,राबवण्याचे ठरवले आहे. यापुढेही ग्रामस्तरावर व्यापक जनजागृती करण्याची गरज असून असेच प्रयत्न यापुढेही ठेवत कोरोनासी लढावे लागेल असे ते बोलत होते. सुत्रसंचलन जाधव एम एम यानी केले.

## ग्रीन लातूर वृक्ष टिमच्या वतीने मियावाकी पध्दतीने २४० झाडांचे रोपण

**लातूर/प्रतिनिधी**



शहरातील नागरिक आणि झाडांचे गुणोत्तर हे झपाट्याने कमी होतंय. एका माणसामागे सात झाडे असं प्रमाण असण्याची गरज असताना पाच झाडांमागे एक माणूस इआतकी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरीकरण झपाट्याने वेग घेतंय...टोलेजंग इमारती उभ्या राहतायत.. मोठमोठे हायवे होत आहेत, सिमेंटची जंगले उभी राहत आहेत, पण यासर्वांच्या जागेवर असलेली झाडे गेली कुठे ? आधीच इथे जागेची अडचण..त्यात झाडं कुठे लावायची असा नाराजीचा सूर आपण आळवतो.. पण मियावाकी ही झाडे लावण्याची अशी पद्धत आहे जिथे कमी जागेत जंगल निर्माण होऊ शकते...उदाहरणार्थ जिथे सहा चारचाकी गाड्या उभ्या राहतात इतक्या लहान ठिकाणात ३०० विविध प्रकारची झाडे लावली जाऊ शकतात.याप्रमाणे आज ग्रीन लातूर वृक्ष टिम , इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर, वुमन्स डॉक्टर विंग, पशू वैद्यकिय सर्व चिकित्सालय यांनी एकत्रितपणे पशू वैद्यकीय रुग्णालय, शाम नगर येथे २४० वनस्पतींच्या रोपे लावली. यामध्ये वड, चिंच, पळस, जांभूळ, बांबू, सिताफळ, कडुनिंब, शिसम,कांचनार ही झाडे लावली.वाढतं शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ढासळलेला तोल सावरण्यासाठी कमी जागेत जास्त वनस्पतींची लागवड करुन २०२० मधील हे पहिले मियावाकी जंगल उभारलं जात असल्याचे ग्रीन लातूर वृक्ष टिमचे डॉ. पवन लड्डा यांनी सांगितले.

यावेळी ग्रीन लातूर वृक्ष टिमचे डॉ. पवन लड्डा, नगरसेवक इम्रान सय्यद, आय. एम. ए. अध्यक्ष डॉ. विश्वास कुलकर्णी, वुमन्स डॉक्टर विंगच्या अध्यक्षा डॉ. अनुजा कुलकर्णी, पशूवैद्यकिय चिकित्सालयाचे डॉ. नानासाहेब कदम, एस.टी. महामंडळ चे विभागिय अधिक्षक सचिन क्षीरसागर, जेष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष डॉ. बी.आर.पाटील, डॉ. रचना जाजू, डॉ. सौ. सविता काळगे, डॉ. सौ. अंजली कवठाळे, डॉ. सौ. वारद, श्री महेबूब पटेल, डॉ. भास्कर बोरगावकर, पद्माकर बागल, प्रमोद निपानीकर हे उपस्थित होते. यावेळेस मनमोहन डागा, रुषिकेश दरेकर, गंगाधर पवार, सुहास पाटील, जफर शेख, हितेश डागा, चैतन्य प्रयाग, मिर्झा मोईझ, सुलेखा कारेपुरकर, सार्थक शिंदे, रुषिकेश पोद्दार, डॉ. मुश्ताक सय्यद, पुजा निचळे, प्रफुल्ल पाटिल, सौ. धर्माधिकारी, वैभव डोळे, आशिष सुर्यवंशी यांनी झाडे आणणे, खड्डे खोदणे, झाडे लावणे, झाडांना काठ्या बांधणे, झाडांना पाणी देणे याकरीता परिश्रम घेतले.

## ५ दिवसापासुन बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बंद

**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूर तालुक्यातील काजळ हिप्परगा येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखा चार पाच दिवसापासून बंद आहे. तालुक्यातील काजळ हिपरगा येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखा चे मागील चार ते पाच दिवसापासून इंटरनेट बंद असून पिक कर्ज वितरणाच्या प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांचे बंद कारभारामुळे मोठ्य प्रमाणात हाल होत आहेत. अहमदपूर तालुक्यातील काजळ हिप्परगा येथील बँक ऑफ महाराष्ट्राची शाखा फार जुनी असून त्या शाखेमध्ये पाच ते सहा हजार बचत खातेदार आहेत तसेच १००० पिक कर्जाचे खातेदार आहेत सदरील बँक मागील सोमवारपासून इंटरनेट कनेक्टिव्हिटी अभावी बंद असून अद्याप पर्यंत दुरुस्तीचे काम करण्यात आले नाही याबाबत शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधला असता इमारत मालकांनी बँकप्रशासनास सुचना न देता बँकेच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम सुरू केल्यामुळे इंटरनेटची कनेक्टिव्हिटी येत नाही. त्यामुळे मागील चार पाच दिवसांपासून बँकेचे सर्व व्यवहार बंद असल्याचे सांगितले जात आहे.त्यामुळे शेतकरी व ग्राहकांना विनाकारण बँकेमध्ये हेलपाटे मारावे लागत आहेत तर ग्रामीण भागातून काही शेतकरी ग्रामीण भागात बस चालु नसल्यामुळे भाड्याचे खाजगी वाहने घेऊन येत आहेत.व बँक बंद असल्याने त्यांना परत जावे लागत आहे. व खाजगी वाहनाचे भाडे विनाकारण भरावे लागत आहेत सध्या पेरणीचे दिवस असल्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप व आपल्या खात्यातून रक्कम काढणे गरजेचे असते. गावातील ग्राहकांना व शेतकऱ्यांना नाहक या अडचणीचा सामना करावा लागत आहे. बँकेतील वरच्या मजल्याचे बांधकाम चालु असल्यामुळे इंटरनेट सेवा बंद आहे. शाखा व्यवस्थापक अजित अग्रवाल यांनी सांगितले.

22 TO 28 JUNE 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 20/06/2020 7:39 PM Page 1



# देवणी येथे कोरोनो योद्धांचा सत्कार संपन्न



**देवनी/शकिल मनियार**

देवणी तालुक्यात गेल्या तीन महिन्यापासून कोरोनो प्रतिबंध लढ्यात अहोरात्र परिश्रम घेऊन तालुका कोरोना मुक्त ठेवण्याची कामगिरी बजावणाऱ्या प्रशासनाचा आणि पत्रकारांचा यथोचित जाहीर सत्कार धनुरे मंगल कार्यालयात करण्यात आला. आमदार संभाजीराव पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कार्यकर्त्या तर्फे हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवणीचे तहसीलदार सुरेश घोळवे हे होते. सत्कार मूर्ती म्हणून आरोग्य खात्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गंगाधर पर्गे आणि देवणीचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नीळकंठ सगर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गीरी, गटशिक्षणाधिकारी पारसेवार व पोलीसांचा व त्यांच्या सहकाऱ्यांसह नगरपंचायत वीज वितरण आशा कार्यकर्त्या आणि पत्रकार यांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र तिरुके प्रशांत पाटील जवळगेकर, पृथ्वीराज शिवशिवे, सभापती चित्रकला ताई बिरादार, नगराध्यक्ष वैजनाथ आष्टुरे, उपसभापती शंकरराव पाटील, काशिनाथ गरीबे, बाबुराव इंगोले, बसवराज पाटील, मनोहर पटणे, ओम धनुरे, रमेश मणसुरे, अटल विश्वास धनुरे, कुमार पाटील, कल्याण धनुरे, मयूर पटणे, संतोष पाटील, प्रशांत पाटील, राहुल तपसाळे, सोमनाथ बोरुळे, साईनाथ बिरादार, सुधीर भोसले, डॉक्टर कालिदास बिरादार, पोलिस उपनिरीक्षक रणजीत काथवटे, सहाय्यक गटविकास अधिकारी अच्युत पाटील, पोलिस नाईक सर्फराज गोलंदाज, लक्ष्मण नागरगोजे, इरशाद शेख, महिला भा.ज.पा.अध्यक्ष रंजना पोलकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती या कार्यक्रमास होती. यासोबतच वृक्षारोपण रक्तदान शिबिर मास्क चे वाटप आदी कार्यक्रम घेण्यात आले.

# कंपनीतील कोरोना बाधित कामगारांचे रिपोर्ट येईपर्यंत कंपनी बंद ठेवण्याची महिलांची मागणी

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील वसुरी गावाच्या हद्दीत असलेल्या ब्लु स्टार या कंपनीत कार्यरत असलेली एक व्यक्ती कोरोना सकारात्मक झाली असल्याने संपर्कात आलेल्या ११ जणांचे कंपणीतच विलगीकरण करण्यात आले होते. मात्र या ११ जणांना कुणालाही कल्पना न देता अचानक पोशेरी येथील कोरोना उपचार केंद्रात दाखल केल्याने याबाबत संताप म्हणून तसेच या ११ व्यक्तींचे अहवाल येईपर्यत कंपनी बंद ठेवावी या मागणीसाठी शनिवारी महिलांनी गेट समोर बसून आंदोलन केले. ब्लु स्टार ही एक नामवंत कंपनी असून येथे स्थानिक तर काही बाहेरील शहरातील असे सुमारे ३५० कर्मचारी कार्यरत आहेत. मिळालेल्या माहिती नुसार कंपनीच्या एका अधिकाऱ्याला कोरोनाचा संसर्ग झाला असल्याने त्यांच्या संपर्कातील ११ जणांचे विलगिकरण कंपनीच्या हॉल मध्ये करण्यात आले होते. पाच दिवसांनंतर अचानक गुरुवारी या कामगारांना पोशेरी येथे हलवून कंपनी सुरू करण्यात आली. कामगारांना पोशेरी येथे नेण्याची कोणतीही कल्पना कामगारांच्या घरातील व्यक्तींना देण्यात आली नसल्याने याविरोधात महिला आक्रमक झाल्या असून जो पर्यत या कामगारांचे अहवाल प्राप्त होत नाहीत तो पर्यत कंपनी सुरू करू नये असा पवित्रा महिलांनी घेतला. अखेर याबाबत कंपनी व्यवस्थापनासोबत सकारात्मक बोलणं झाल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले असून कंपनी सध्या बंद असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य शशिकांत पाटील यांनी दिली.

## मयत कामगाराच्या कुटुंबियांना रिजन्सी कंपनीकडून आर्थिक मदत

वाडा तालुक्यातील खुपरी ग्रामपंचायत हद्दीतील रिजन्सी इस्पात या कंपनीच्या छतावरून पडून मयूर शांताराम शेलार (४५) कामगाराचा (३ जून) मृत्यु झाला होता. सदर कामगाराच्या कुटुंबियांना रिजन्सी कंपनीकडून ९ लाख रुपये मदत देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले असून २५ हजाराची तात्काळ मदत देण्यात आली आहे. हा कामगार भिवंडी तालुक्यातील जांभिवली गावातील रहिवासी असून कंपनीच्या छताच्या दुरूस्तीचे काम करण्यासाठी सदर कामगार चढला असता छताचा पत्रा तुटून हा कामगार खाली असणाऱ्या लोखंडी अँगलवर पडून त्याचा मृत्यू झाला आहे. सदर कामगार हा ठेकेदारीने छत दुरुस्त करण्यासाठी आला असल्याची माहिती मिळाली आहे. या कामगाराच्या मृत्यू प्रकरणी त्याच्या कुटुंबियांना मदत मिळवून देण्यासाठी भाजपाचे जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील, स्थानिक जिल्हा परिषद सदस्य शशिकांत पाटील, दिलीप पाटील खुपरी, शिवसेनेचे गोविंद पाटील, किरण पाटील, आरपीआयचे रमेश भोईर, खरीवलीचे सरपंच महेश जाधव यांनी कंपनी व्यवस्थापनाकडे या कामगाराला मदत मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याने ही मदत मिळाली आहे. दरम्यान कंपनीने मयत कामगाराच्या कुटुंबियांना कबूल केलेली रक्कम एका महिन्याच्या आत देण्याचे कबूल केले असून तसे लेखी आश्वासन कंपनी व्यवस्थापनाकडून देण्यात आले आहे.

पान १ वरून...

## नोकरीच्या बहाण्याने मुलालाच नडले...

मिळाली कि, साकेत रोडजवळ फुटपाथच्या बाजूला एक अंदाजे ३५ ते ४० वयाच्या अनोळखी स्त्रीचा मृतदेह पडलेला आहे. ही माहिती मिळताच राबोडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरतोडे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) सुधाकर हुंबे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप रासम, सपोनि मदन कांबळे, पोउपनि संदीपान सोनावणे, पोउपनि महेश जाधव इत्यादी तातडीने त्या ठिकाणी रवाना झाले. घटनास्थळी दाखल झाल्यावर पोलिसांनी सदर महिलेची पाहणी केली असता, तिच्या गळ्याजवळ धारदार शस्त्राने वार करून खून केल्याचे दिसत होते. तसेच तिच्या अंगावरील दागिने पण घेऊन गेल्याचे दिसून येत होते. पोलिसांनी सदर महिलेचा प्रेताचा पंचनामा करून तो मृतदेह पोस्टमार्टेमसाठी सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. आणि या गुन्ह्याचा तपास सुरू केला. सदर महिला कोण, कुठली, तिचे नाव, गाव काय? याची काहीही कल्पना नव्हती. सुरुवातीला तिची ओळख पटवणे आवश्यक होते. त्यादृष्टीने पोलिसांचे प्रयत्न सुरू होते. हा गुन्हा उघडकीस आणणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. ठाण्याचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर सहपोलीस आयुक्त सुरेशकुमार मेकला, अपर पोलीस आयुक्त अपर पोलीस आयुक्त अनिल कुंभारे, परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे व सहा. पोलीस आयुक्त नीता पाडवी (नौपाडा विभाग), यांच्या मार्गदर्शनाखाली बरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरतोडे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) सुधाकर हुंबे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप रासम, सपोनि मदन कांबळे, पोउपनि संदीपान सोनावणे, पोउपनि महेश जाधव, पोलीस स्टाफ अमोल औताडे, प्रदीप शिंदे, दयानंद नाईक, वाहिद तडवी, शेखर तडवी, रझाक खान, केशव धापशी इत्यादी या गुन्ह्याचा तपास करत होते. तपास चालू असताना पोलिसांना अशी माहिती मिळाली कि, शिवाजीनगर राबोडी येथील रेश्मा युनुस अन्सारी हि महिला रात्रीपासून बेपत्ता असून तिचा पती तिला रात्री शोधत होता. तसेच तो बेपत्ता पत्नीची तक्रार देण्यासाठी राबोडी पोलीस ठाण्यात येण्याआधी तासाभरातच त्याचा शोध घेऊन पोलिसांनी त्याची विचारपूस केली. तेव्हा त्याने आपली पत्नी ही रात्री पासून बेपत्ता असल्याचे सांगितले. पोलिसांनी लगेच त्याला सरकारी दवाखान्यात नेऊन पोलिसांनी पंचनामा करून पोस्टमार्टेमसाठी दाखल केलेली एका अनोळखी महिलेचा मृतदेह दाखविला असता, तो मृतदेह बघून त्याने एकच टाहो फोडला. साहेब ही माझी पत्नी रेश्मा आहे असे ठणकावून सांगितले. आता मयत महिलेची ओळख पटली होती. पण तीच खून कोणी केला याबाबत तिच्या पतिकडे चौकशी केली असता, त्याने आपल्याला काही माहिती नसल्याचे सांगितले. मग पोलिसांनी या गुन्ह्याचा तांत्रिक माहितीच्या आधारे आणि सीसीटीव्ही फूटेजच्या आधाराने तपास केला असता अविश्रांतपणे आणि चिकाटीने रात्रभर राबोडीचे एंट्री, एक्झिट पॉइंट तसेच महिलेच्या राहते. घराजवळील सर्व फुटेजची पाहणी केली असता मृतक महिला रात्री ८.०० वाजता एका रिक्षामध्ये आकाशगंगा येथून बसून जाताना दिसून आली. पोलिसांना सदर रिक्षाचा १५४४ अर्धवट क्रमांक मिळाला. त्याअनुषंगाने तपास करून रिक्षाचा योग्य क्रमांक मिळवून रिक्षा मालकाचा शोध घेतला असता, सदर रिक्षा हि कळवा येथील असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून पुढील तपासात तीच रिक्षा मुळ मालकाने राबोडी येथील एका इसमाला चालवण्यास दिली असल्याचे समजले. त्यावरून त्या चालकाचा शोध घेतला असता तो उत्तरप्रदेश मधील मूळ गावी गेल्याचे दिसून आले. त्याच्याशी संपर्क साधून माहिती घेतली असता त्याने सदर रिक्षा हि मूळ गावी जाताना त्याचा नातेवाईक शहानवाज युनुस अन्सारी याला चालवण्यास दिली असल्याचे सांगितले. शहानबाज अन्सारी हा मयताच्या नवऱ्याच्या पहिल्या बायकोचा मुलगा असल्याचे तपासत निष्पन्न झाल्याने त्यास शोधून ताब्यात घेऊन त्याचे कडे कसून चौकशी केली असता त्याने हा गुन्हा केल्याचे कबुल केले. शहानवाज युनुस अन्सारी (२४ ) असे या संशयित आरोपीचे नाव असून तो रूम नं ०१, शालेशाह बाबा दर्गाजवळ, बापुजी नगर जुने राबोडी पोलीस स्टेशन जवळ ठाणे (प) या ठिकाणी राहत होता. तो शिलाईकाम काम करून पॉट भरत होता. मुळचा उत्तरप्रदेश येथील अन्सारी मोहल्ला, गाव उमरपूर आसा. ता धामपूर जि. बिजनोर चा रहिवासी असलेला शहानवाज युनुस अन्सारी हा मयत महिला रेश्मा हिचा सावत्र मुलगा आहे.र ेश्माला १८ वर्षांचा मुलगा आणि १९ वर्षांची मुलगी आहे. तर तिचा पती युनूस याच्या पहिल्या पत्नीचा शाहनवाज हा मुलगा आहे. त्यामुळे ती त्याला ओळखत होती. ती सावत्र आई असली तरी लहानपणापासूनच शाहनवाजसह त्याचा लहान भावाचा तिने छळ सुरू केला होता. तिच्याच छळामुळे लहान भावाचाही मृत्यु झाला होता. तिने कधीही काहीच मदत केली नाही. मात्र, परदेशात नोकरी लावण्याच्या नावाखाली शहानवाजने साठवून ठेवलेली ९० हजारांची रक्कमही तिने एक वर्षांपूर्वी शहानवाज याच्याकडून घेतली. त्यानंतर त्याला घरातून हाकलून दिले होते. वडिलांना सांगूनही तिच्या वागण्यात काहीच फरक पडला नव्हता. शिवाय, तिने घेतलेल्या पैशांबाबत विचारणा केल्यावरही ती टाळाटाळ करीत होती. कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे कामही नसल्यामुळे जवळचे सर्व पैसेही संपले होते. तिच्याकडे पैसे मागितल्यानंतर तिने मात्र पैसे देण्यास नकार देऊन शिवीगाळ करीत धमकी दिली. याच कारणातून तिचा खून करण्याचा शहानरवाज याने निर्णय घेतला. त्यानुसार २८ मे रोजी रेश्मा त्याला राबोडी बाजारात भेटली. मला पैशाबाबत तुझ्याशी बोलायचे आहे असे सांगून गुरुवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मित्राच्या रिक्षातून त्याने तिला साकेत रोडवर नेले. तिथेच तिच्या गळ्यावर रागाच्या भरात वार करुन तिचा खून केल्यानंतर मंगळसूत्र आणि कानातील झुमके काढले. नंतर रिक्षासह तिथून पळाल्याची कबूली त्याने पोलिसांनी दिली. या प्रकरणी राबोडी पोलिसांनी शहानवाज युनुस अन्सारी याला अटक करून त्याच्या विरुद्ध राबोडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ३५७/२०२० कलम ३०२ अन्वये दाखल करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यातील मयताच्या अंगावरील सोन्याचे दागिने, गुन्ह्यात बापरलेली रिक्षा, वापरलेले हत्यार व कपडे आरोपींकडे मिळून आल्याने पोलिसांनी ते हस्तगत केले आहे. अशा प्रकारे एका अनोळखी मयत महिलेची ओळख पटवून २४ तासाच्या आतमध्ये आरोपीस अटक करून हा गंभीर गुन्हा पोलिसांनी उघडकीस आणला आहे. ही कामगिरी ठाणे शहर पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, सहपोलीस आयुक्त सुरेशकुमार मेकला, अपर पोलीस आयुक्त अनिल कुंभारे, (पश्चिम प्रादेशिक विभाग), पोलीस उपआयुक्त सुभाष बुरसे (परिमंडळ ०१), सहा.पोलीस आयुक्त नीता पाडवी (नौपाडा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली बरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरतोडे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) सुधाकर हुंबे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप रासम, सपोनि मदन कांबळे, पोउपनि संदीपान सोनावणे, पोउपनि महेश जाधव, पोलीस स्टाफ अमोल औताडे, प्रदीप शिंदे, दयानंद नाईक, वाहिद तडवी, शेखर तडवी, रझाक खान, केशव धापशी इत्यादींनी पार पाडली.

## दोन अल्पवयीन मुलांना वासनेची बाधा झाली....

येथील गल्ली नं १० येथे राहते. तसे हे कुंटुंब केल्या काही वर्षापासुन तेथे राहत असल्याने चांगल्या प्रकारे रूळले होते. येथे राहत असताना त्याचे शेजार पाजाऱ्याशी ही चांगले जमत होते. या कुंटुंबातील चार वर्षाची एक चिमुरडी मुलगी ही आपल्या बोलक्या बोबडया स्वभावाने शेजार पाजऱ्यात रमत होती. म्हणूनच ती कधी ही हसत खेळत आपल्या अंगणात बिनधास्त खेळत होती. रविवार दि.१४ जून रोजी दुपारी ३.३०च्या दरम्यान ही मुलगी आपल्या अंगणात अशीच खेळत होती. अंगण तसे छोटेच होते. कारण शाहूनगरचा परिसर म्हणजे मोठया गल्ल्या आणि त्यामधुन जाणारे रस्ते असेच येथील चित्र बघायला मिळते त्यातच लहान मोठे यंत्रमाग कारखाने असल्याने बीम आणि तागे नेण्यास येणाऱ्या वाहनानी गर्दी ही होत असते. त्या अररूद छोठेखानी अंगणात ती मुलगी खेळत असल्याने घरात असणारे ही आपआपल्या कामात व्यस्त होते. मुलगी खेळुन झाले की नेहमीप्रमाणे घरात येते हा त्याचा अनुभव होता. त्यामुळे तिच्या घरच्या लोकांचा तिच्या खेळण्याकडे लक्ष नव्हते. शेजार पाजाऱ्याचे ही तिच्याकडे लक्ष असते हे त्याना माहित होते. संध्याकाळचे पाच ते सहा वाजले तरी ती मुलगी घरात आली नाही. म्हणुन तिच्या आई वडिलांनी तिला शोधायला सुरूवात केली. मुलगी अंगणात खेळता खेळता बेपत्ता झाली म्हणुन तिच्या आई वडिलांचा जीव टांगणीला लागला.ते आणि शेजारचे लोक त्या चिमुरडीचा शोध आजुबाजुला घेऊ लागले. शेजारी असणाऱ्या कुणाच्या तरी घरी गेली असेल म्हणून तेथे शोध घेतला.खेळता खेळता बाजुलाच असणाऱ्या ऊसाच्या शेतात गेली असेल म्हणुन तिकडे ही शोध घेतला. शोध घेणाऱ्याच्यामध्ये दोन अल्पवयीन मुले ही होते. त्या अल्पवयीन मुलापैकी एक जण त्या कुंटुबाचा नातेवाईक होता. तर दुसरा सराईत गुन्हेगार होता. ते दोघे ही त्या चिमुरडीचा शोध घेत होते. संध्याकाळचे सात साडेसात वाजले तरी त्या मुलीचा शोध लागेना. तिची आई आजी धायं मोकलून रडु लागल्या होत्या. त्या बेपत्ता मुली विषयी काहीनी व्हाटसगुप्रवर ही टाकले होते. त्या मुलीचा त्यामुळे शेजारच्या गल्लीत ही बातमी समजली. त्यावेळी एका जागृक नागरिकाला एक मुलगी ते राहत असलेल्या ५०० ते ७०० मीटर अंतरावरील ऊसाच्या शेतानजीक असलेल्या गोरखनाथ कुंभार याच्या पडक्या विहिरीत पडली असल्याची माहिती मिळाली. त्याने ही माहिती लगेच त्या मुलीच्या घरच्या लोकांना दिली. हे ऐकुन सगळ्यांनी तिकडे धाव घेतली. तेथील पाण्यात ती मुलगी पालथी पडली होती. धाडस दाखवुन लगेच गल्लीतील तरूण मुलांनी त्या विहिरीतुन त्या मुलीला बाहेर काढले. ती जिंवत आहे का मेली हे समजायला मार्ग नव्हता. म्हणून तिला लगेच इचलकरंजी येथील आयजीएम हॉस्पिटलमध्ये नेण्याचा सल्ला काहीनी दिला. त्या मुलीला आयजीएमला आणले असता. तेथील डॉक्टरांनी तिला तपासुन तिचा एक तासापुर्वीच मृत्यु झाल्याचे तिच्या नातेवाईकांना सांगितले. हि घटना तिच्या कुंटुंबियासाठी क्लेशदायक होती. खेळता खेळता बेपत्ता झालेल्या मुलीचा मृतदेह बघुन अनेकांच्या डोळ्यात पाणी आले. अशातच आयजीएमच्या डॉक्टरांनी तिला न तपासताच मृत्यु घोषीत करुन तिचा लागलीच अंतीम संस्कार करण्याचा सल्ला तिच्या नातेवाईकांना दिला. तिच्या घरच्या लोकाना ही मुलगी खेळत जावून विहिरीत पडली असेल असे वाटले आणि त्यात तिचा मृत्यु झाला असेल वाटले म्हणुन त्यांनी तिचा अंतीम संस्कार करण्याचे ठरविले. ग्रामीण भागात आजही डॉक्टर हा देव असतो. आणि त्याचा शब्द हा प्रमाण असतो असे मानले जाते तसेच त्या कुटुंबियाने देखील मानले आणि डॉक्टरांचा सल्ला मानून आपल्या कर्माला दोष देत तिचा अंतीम संस्कार इचलकरंजी येथील लिंगायत समाजाच्या रुद्र भुमीत करून तिचा दफन विधी आटोपला. या सगळ्यात भानगडीत आयजीएमच्या प्रशासने मात्र सावळा गोंधळ घातला. त्या मुलीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन न करताच तिचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला होता. त्यामुळे त्या मुलीचा घातपात झाला आहे काय किंवा त्या मुलीवरती कुणी लैंगिक आत्याचार केले आहेत का रिपोर्टच त्यांनी बनविला नाही. आयजीएम प्रशासनाच्या या सावळ्या गोंधळाने त्या मुलीवर आत्याचार करणारे संशयीत आरोपी मात्र मोकाट होते. त्यांनी केलेले कृत्य झाकून गेले होते. मात्र दुसऱ्या दिवशीचा सुर्य उजाडताच गल्लीत आणि परिसरात या घटनेची उलट सुलट चर्चा चालु होती. त्यातुनच त्या मुलीवर लैंगिक आत्याचार झाल्याची चर्चा ही होत होती. एका दक्ष नागरिकाने या घटनेची माहिती शिवाजी नगर पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. ते या घटनेची माहिती घेत असताना मयत मुलीच्या आई वडिलाना ते विचारीत होते. मुलगी विहिरीत पडली आणि त्यात तिचा मृत्यु झाला हे ते सांगत असताना त्यांनी या घटनेची माहिती पोलीसांना का दिली नाही? असा प्रश्न विचारल्यावर ते ही गोंधळुन गेले. त्याचप्रमाणे आयजीएमच्या प्रशासनाने ही पोलिसांना या घटनेची माहिती दिली नव्हती. त्या मुलीवर लैंगिक आत्याचार झाल्याची माहिती पोलीसाना मिळाल्याने त्यांनी चौकशीला सुरूवात केली. त्यातच त्या परिसरातील एका यंत्रमाग कारखान्याच्या सीसीटिव्ही फुटेजमध्ये एक मुलगा त्या मुलीला घेऊन जात असल्याचे दिसत होते. यावरून पोलीसांनी चौकशीला सुरूवात केल्यावर एका मुलाला ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस स्टेशनला आणले. त्यावेळी शिवाजी नगर पोलीस स्टेशनच्या आवारात शाहूनगरमधील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. घटनास्थळी डीवायएसपी गणेश बिरादार, पो.नि.ईश्वर ओमाशे पोलीस पाटील राहुल वाघमोडे, संजय घोरपडे यांनी भेट दिली. पोलीस त्या मुलाकडे चौकशी करत असताना त्या बेपत्ता मुलीच्या मृत्युची धक्कादायक माहिती समोर आली. पोलिसांनी लागलीच लिंगायत रुद्रभुमीतुन पंचासमक्ष दफन केलेल्या त्या मुलीचा मृतदेह खड्डयातुन बाहेर काढुन शवविच्छेदनासाठी पाठवुन दिला. दुसऱ्या दिवशी तो रिपोर्ट ही पोलीसाना मिळाल. त्यामध्ये त्या मुलीवर लैंगिक आत्याचार झाल्याचे स्पष्ट केले होते. तसेच त्या मुलीला विहिरीत टाकल्यानंतर तिच्या डोक्याला मार लागल्याने तिचा मृत्यु झाला असे लिहिले होते. पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या त्या अल्पवयीन मुलाकडे चौकशी केली असता त्या मुलांनी ही आपण त्या मुलीला घटनेच्या दिवशी ती अंगणात खेळत असताना चॉकलेटचे अमिष दाखवुन नेले आणि तिच्यावर जवळच्या ऊसाच्या शेतात नेऊन लैंगिक आत्याचार केले. तसेच हि घटना उघडकीस येऊ नये म्हणुन त्या मुलीला तेथेच जवळच असणाऱ्या गोरख कुंभार याच्या विहिरीत ढकलून देऊन आम्ही दोघांनी तेथुन पोबारा केला अशी माहिती पोलीसांना दिली. या दोन्ही अल्पवयीन मुले ही गुन्हेगारी प्रवृतीचे असल्याचे त्याच्या वर्तणुकीवरून दिसुन येत होते. त्यातील एका मुलाची आई आपल्या उदरनिर्वाहासाठी गारमेंट मध्ये काम करते. तर दुसऱ्या मुलाची आई ही उदरनिर्वासाठी मोलमजुरी करते. त्यांची ही मुले गुन्हेगारी वळुन नशिल्या पदार्थाच्या ही आहारी गेल्याचे समजते. त्या दोघांनीच त्या चार वर्षाच्या मुलीला चॉकलेटचे अमिष दाखवुन ऊसाच्या शेतात नेऊन लैंगिक आत्याचार केले आणि मारून टाकले. सदरची घटना ही माणुसकीला ही काळीमा फासणारी होती. या घटनेनंतर पिडीत मुलीच्या वडिलांनी ती मुलगी असल्याचा तिचा दोष होता काय? अशी जळजळीत प्रतिक्रिया दिली. तर या घटनेनंतर मुलीची आई बेशुध्द पडली होती. शुध्दीत आल्यावर तिने ही आपल्या चिमुकल्या मुलीवर लैंगिक आत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा दया अशी मागणी करून त्याच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली.तिच्या तक्रारीवरून पोलीसांनी या दोन्ही मुलांच्या विरोधात गु.रजि.क्र/२०२० भा.दं.वी.कलम ३०२, ३६३, ३७६, ड.ब.३७६आय सह लहान मुलाचे लैंगिक शोषण या कलमा अंतर्गत गुन्हा नोंदवून त्याना मा.कोर्टा समोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याची रवानगी बालसुधारगृहात केली. दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ चंदुर आणि शाहूनगरमधील नागरिकांनी उस्तुर्फूतपणे आपले व्यवहार बंद ठेवून निषेध नोंदवला होता.तसेच मा.खा.धैर्यशील माने यांनी देखिल पिडीत मुलीच्या कुंटुबियाची भेट घेऊन त्याचे सात्वंन करून धीर दिला होता. या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र युवा सेनेच्या कार्यकर्त्यानी प्रांत कार्यालया समोर निदर्शने करुनया घटनेतील आरोपीना लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी करून तसे निवेदन दिले. त्याचप्रमाणे आयजीएमच्या प्रशासनाची चौकशी करून या प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या डॉक्टरावर कारवाई करावी अशी मागणी केली.काही झाले तरी अशा नराधमाना जबर शिक्षा ही लवकर व्हावी तरच अशा घटनाना पायबंद बसेल.

## जमिनीसाठी सख्खा भाऊ वैरी झाला ...

हुमाणी बंडू राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,१० जून रोजी सकाळी सातच्या सुमारास खंडू मिसू राठोड, राजेश मिसू राठोड, बेबीबाई खंडू राठोड, प्रियंका राजेश राठोड, कांताबाई मिसू राठोड, संजय मिसू राठोड, निखिल खंडू राठोड, निकिता खंडू राठोड व पांडू मिसू राठोड यांनी बंडू राठोड, यशोदाबाई राठोड यांना मारहाण करुन जबरदस्तीने विष पाजले व त्यांच्या अंगावर विष ओतले. दोघांनाही तातडीने माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. नंतर त्यांना यवतमाळ येथील स्व.वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. उपचार सुरू असतानाच मंगळवारी सकाळी ८३० च्या सुमारास बंडू राठोड यांचा मृत्यू झाला तर बुधवारी यशोदाबाई यांचा मृत्यू झाला. सिंदखेड पोलिसांत याप्रकरणी वरील आरोपींविरुद्ध बुधवारी मध्यरात्री खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. गुरुवारी खंडू राठोड, राजेश राठोड या दोघांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना २२ जूनपर्यत पोलीस कोठडी दिल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक मल्हार शिवरकर यांनी दिली. भावकीत नेहमीच उडायचे खटके माहूर तालुक्यातील जुनापाणी येथील बंडू मिसू राठोड यांना जुनापाणी येथे वडिलोपार्जित ५ एकर व वाई बाजार येथे मेहनतीच्या जोरावर घेतलेली ४ एकर, अशी एकूण ९ एकर जमीन आहे. त्या जमिनीवर खंडू मिसू राठोड यांचा डोळा होता. समसमान हिस्सा वाटून देण्याचे कारण पुढे करून भावकीत नेहमीच खटके उडत असत. त्यावर तोडगा काढण्यासाठी काही दिवसांपूर्वी समाजातील पंचांसमक्ष बैठकही झाली. मात्र, त्यात तोडगा निघाला नाही.

## विनयभंगाच्या वादातून खून खराब झाला...

बघून घराजवळ राहणारा अविवाहीत गुलाब तिचा दिवाना झाला होता. गुलाब आणि करिश्माचे घर एकाच गावात हाकेच्या अंतरावर होते. गुलाबची नजर करिश्मावर खिळून रहात असे. एके दिवशी गुलाबला राहवले गेले नाही. त्याने आपला मोर्चा थेट करिश्माच्या घरात अनाधिकारे नेला. अनाधिकारे घरात प्रवेश करत त्याने करिश्मासोबत गैरवर्तन अर्थात तिचा विनयभंग केला. गुलाबच्या या कृतीमुळे करिश्माच्या मनात लज्जा निर्माण झाली होती. तिने हा प्रकार तिच्या पतीच्या कानावर घातला. दारुच्या नशेत घरी आल्यावर तिच्या पतीने गुलाब यास काटेरी बोल सुनावले. हा प्रकार करिश्माचे सासु सासरे व दिराला देखील समजला. त्यांनी करिश्माची बाजू घेत गुलाबसह त्याच्या आईवडीलांना शिवीगाळ सुरु केली. गुलाबची बाजू सावरण्यासाठी त्याचे आई-वडील व भाऊ एकत्र आले. त्यांनी गुलाबची बाजू सावरण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. विनयभंगाच्या त्या घटनेपासून गुलाब व करिश्माचा पती या दोघात वितुष्ट निर्माण झाले व संघर्षाला सुरुवात झाली. या प्रकरणी करिश्माने गुलाबच्या विरोधात यावल पोलिस स्टेशनला सन २०१७ मधे विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. भाग ५ गु.र.न. १०२/१७ भा.द.वि. ३५४ कलमान्वये यावल पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर न्यायप्रविष्ठ गुन्हयात न्यायालयाने गुलाब यास तिन वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा व पाच हजार रुपये दंड ठोठावला. दोन वर्ष न्यायालयीन कैदेत गेल्यानंतर गुलाब सन २०१९ मधे जामिनावर सुटून बाहेर आला. जामिनावर बाहेर आल्यानंतर तो आपल्या गावी परत आला. त्याच्या घरापासून करिश्माचे घर हाकेच्या अंतरावर होते. त्यामुळे पुन्हा करिश्माचा पती व गुलाब यांना एकमेकाचा चेहरा बघण्याची वेळ आली. करिश्मासह तिचा पती आणि गुलाब हे दोघे एकमेकांच्या समोर येवू लागले. गुलाबला बघून करिश्माला संकोचल्यासारखे वाटत होते. गुलाब समोर दिसला म्हणजे करिश्माच्या पतीचा तिळपापड होत असे. गुलाबला खाऊ का गिळू अशी त्याच्या मनाची अवस्था होत असे. दारुच्या नशेत करिश्माचा पती गुलाब यास शिवीगाळ करत असे. आपल्या पत्नीचा गुलाबने केलेला विनयभंग त्याला सतत आठवत असे. गेल्या तिन ते चार वर्षापुर्वी झालेल्या या वादाचे पडसाद कमी अधिक प्रमाणात उमटत होते. सन २०१७ सालापासून एकाच गावात हाकेच्या अंतरावर राहणारे हे दोन्ही परिवार जणू काही एकमेकांचे वैरी झाले होते. दिवसामागून दिवस जात होते. भिंतीवरील दिनदर्शिकेच्या तारखा दररोज बदलत होत्या. आता वाद नको असे गुलाबने मनाशी म्हणत त्याने तो रहात असलेले गाव सोडण्याचा निर्णय घेतला. आता करिश्मा व तिच्या पतीचा चेहरा बघायचा नाही आणि वादही वाढवून घ्यायचा नाही असे गुलाबने मनाशी ठरवले. आपल्या मामाच्या गावी शिरसोली येथे रहायला जाण्याचे व जळगावला कामधंदा करण्याचे त्याने मनाशी ठरवले. तो मामाच्या गावी शिरसोली येथे राहण्यासाठी आला. शिरसोली येथे तो काही वेळ सलूनचे काम करु लागला. उर्वरित वेळेत जळगावला खासगी नोकरी करु लागला. अशा प्रकारे गुलाब आपल्या कामधंदयाला लागला. दरम्यानच्या काळात गुलाबचा मोठा भाऊ सुरत येथे नोकरी निमित्त स्थायिक झाला. गुलाबच्या बहिणीचे देखील दरम्यानच्या काळात लग्न झाले. त्यामुळे गावात केवळ गुलाबचे आई वडील असे दोघेच जण रहात होते. अशा प्रकारे हा तिन वर्षाचा अध्याय आता संपला होता. मात्र गुलाबने गाव सोडून दिले तरी देखील करिश्माचा पती व तिचे सासू सासरे गुलाबच्या आई वडीलांकडे खुनशी नजरेने बघत होते. ते दोघांसोबत बघून घेण्याची भाषा करत होते. ९ मे २०२० चा तो दिवस उजाडला. ग्रामीण भागात विज पुरवठा वारंवार खंडीत होत असतो. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे साहजिकच ग्रामीण भागात उकाडा असहय होत असतो. बरेच ग्रामस्थ झाडाच्या सावलीत खाटेवर निजतात. ९ मे च्या दुपारी गुलाबचे वडील त्यांच्या घरासमोर असलेल्या बदामाच्या झाडाखाली खाटेवर निजले होते. त्याठिकाणी अचानक करिश्माचा पती त्याच्या ताब्यातील बैलगाडी सुसाट वेगाने घेवून आला. पत्नीच्या विनयभंगाचा राग त्याच्या मनात होताच. करिश्माच्या पतीने सुसाट वेगाने आणलेल्या बैलगाडीच्या चाकाचा हुक गुलाबचे वडील झोपलेल्या खाटेत दुर्दैवाने अडकला. त्यामुळे ते खाटेसह जवळपास १५ ते २० फुट फरफटत गेले व जखमी देखील झाले. दरम्यान त्या खाटीचा एक पाय तुटला व ते जमीनीवर पडले. काही कळण्याच्या आत झालेल्या या संतापजनक प्रकारामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात राग आला. त्यांनी करिश्माच्या पतीला ओरडून जाब विचारला. त्यावर तेवढ्याच मोठ्या आवाजात त्याने प्रतिप्रश्न केला की तुला तुझी खाट बाजुला टाकून झोपता येत नाही का? रस्त्यात का झोपतो? आधीच अर्धमेल्या अवस्थेतील गुलाबच्या वडीलांना करिश्माच्या पतीने चापटा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. दोघांचे कडाक्याचे भांडण होत असल्याचे समजताच गुलाबची आई तेथे धावत आली. पतीला वाचवण्यासाठी ती मधे पडली. दरम्यान या भांडणाचा आवाज ऐकून करिश्मासह तिचे सासु सासरे व दिर असे सर्व जण धावतच बाहेर आले. त्यांनी गुलाबच्या आई वडीलांना शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. आता यांचे खुप झाले, आता यांना आज ठार मारुया असे म्हणत सर्वांनी दोघा पती पत्नीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी छातीवर, पोटावर, तोंडावर मारहाण सुरु केली. दोघा पती पत्नीला जिवे ठार करण्याची धमकी देत हा मारहाणीचा प्रकार सुरुच होता. या भांडणाचा आवाज ऐकून गल्लीत राहणारे इतर रहिवासी धावत आले. त्यांनी गुलाबच्या आई वडीलांची हल्लेखोरांच्या तावडीतून कशीबशी सुटका केली. या मारहाणीनंतर काही वेळाने सर्व जण आपाआपल्या घरी निघून गेले. गुलाबच्या आई वडीलांनी गुलाबसह त्याच्या मामाला बोलावून घेतले. चौघांनी मिळून यावल पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचे ठरवले. चौघे जण यावल पोलिस स्टेशनला करिश्माच्या पतीसह इतरांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यास आले. तक्रार देत असतांना जखमी गुलाबच्या आईला भोवळ येवून ती जमीनीवर कोसळली. गुलाबसह तिघांनी तिला लागलीच वैद्यकीय उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. दरम्यान गुलाबच्या आईचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी तिला मयत घोषीत केले. गुलाबच्या आईच्या मृत्यूस कारणीभुत असलेल्या पाचही जणांविरुद्ध यावल पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गु.र.न.८०/२० भा.द.वि. ३०२, १४३, ३२३, ५०४, ५०६, १८८ सह मुंबई पोलिस कायदा कलम १३५ चे उल्लंघन नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातील सर्व पाचही संशयितांना अटक करण्यात आली. त्यांना यावल न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायधिश डी.जी. जगताप यांनी पाचही संशयितांना १४ मे पर्यत चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणी सरकारतर्फे सरकारी वकील अॅड. नितीन खरे यांनी कामकाज पाहिले. या गुन्हयाचा तपास यावल पोलिस स्टेशनचे पो.नि. अरूण धनवडे व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक विनोद खंडबहाळे व हे.कॉ. संजय तायडे करत आहेत. (या कथेतील करिश्मा हे नाव काल्पनिक आहे)

# खाजगी वाहनांवर बेकायदेशीर अंबरदिवा लावून फिरणाऱ्या उपविभागीय अधिकाऱ्याची ड्युटीवरील पोलिसांना अरेरावी




**हिंगोली/क्राईम रिपोर्टर**

विनापरवाना खासगी वाहनावर अंबर दिवा लावण्यासह विविध कलमान्वये हिंगोली येथील आरडीसी चंद्रकांत सुर्यवंशी यांच्यावर शनिवारी गुन्हा दाखल करण्याबाबतची तक्रार (फिर्याद नव्हे) देण्यात आली आहे. पोलिस उप निरीक्षकास अरेरावी करणे, शिवीगाळ करणे तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी वादाचा प्रकार हिंगोली शहर पोलिस स्टेशनच्या पोलिस उप निरिक्षकासोबत दोन दिवसांपुर्वी घडला. या घटनेची सर्वत्र चर्चा होतांना दिसत आहे. विशेष म्हणजे वरिष्ठ पोलिस अधिका-यांकडून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला होता असे देखील समजते. मात्र संबंधीत पोलिस उप निरीक्षकाने धाडस दाखवत या घटनेच्या नोंदी घेतल्या.

या घटनेबाबत सविस्तर वृत्त असे की साईनाथ भुमन्ना अनमोड हे हिंगोली शहर पोलिस स्टेशनला पोलिस उप निरिक्षक पदावर कार्यरत आहेत. १३ जून रोजी कोरोना प्रतिबंधक उपाययोजना बंदोबस्त कामी उप निरीक्षक साईनाथ अनमोड हे आपल्या सहका-याच्या मदतीने हिंगोली येथील इंदिरा चौकात ड्युटीवर हजर होते. दरम्यान सकाळी ११.५० वाजता त्यांना अकोला बायपासमार्गे एक चारचाकी वाहन (एमएच २३ एएस ७२२३) येतांना दिसले. या वाहनावर अंबर दिवा लावलेला होता. पो.उ.नि. साईनाथ अनमोड यांनी या वाहनाला थांबवून हाफ पँटवर असलेल्या चालकाची विचारपूस केली. त्यावर चालकाने त्यांना आपले नाव गाव न सांगता सांगीतले की मी या जिल्हयाचा आरडीसी आहे. काही वेळाने तपासाअंती सदर चालक हे आरडीसी सुर्यवंशी असल्याचे उपनिरीक्षक अनमोड यांना समजले. त्यावेळी उप निरिक्षक अनमोड यांनी चालकाच्या रुपातील आरडीसी सुर्यवंशी यांना त्यांच्या ताब्यातील वाहन सरकारी आहे की खासगी? याबबत विचारणा केली. सदर वाहन खासगी असल्याचे समजल्यानंतर अनमोड यांनी म्हटले की साहेब तुम्हाला खासगी वाहनावर अंबर दिवा लावता येत नाही.

त्यावेळी संतप्त झालेल्या चालक सिटवर बसलेल्या आरडीसी यांनी अनमोड यांना म्हटले की आता तु मला नियम शिकवणार आहे का? तुझी काय औकात आहे बे, थांब तुझ्या एस.पी. ला फोन लावतो, असे म्हणत त्यांनी कुणाला तरी फोन लावत बोलण्यासाठी दडपण टाकण्यास सुरुवात केली. मात्र अनमोड यांनी त्या मोबाईलवर संबंधितासोबत बोलण्यास नकार दिला. आरडीसी सुर्यवंशी यांना सरकारी वाहनात बसण्यास सांगण्यात आले व वाहन पोलिस स्टेशनला घेण्याची सुचना अनमोड यांनी आपल्या सहकाऱ्यास केली. त्यावर संतप्त झालेल्या आरडीसी यांनी अनमोड यांना म्हटले की अबे साल्या सोड माझी गाडी, माझी गाडी कुठे घ्यायची ते सांग मला. त्यांच्या वाहनात काही कर्मचा-यांना बसवून गाडी पोलिस स्टेशनला घेण्यास अनमोड यांनी सांगितले. त्यांच्या मागे मागे उप निरीक्षक अनमोड देखील त्यांच्या ताब्यातील वाहनाने पोलिस स्टेशनला आले.

या गदारोळात पो.नि.सैय्यद यांनी अनमोड यांना आरडीसी यांच्या समक्ष आपल्या कॅबीनमधे बोलावले. त्याठिकाणी आरडीसी सुर्यवंशी यांनी अनमोड यांना सुनावले की की तुझी काय औकात आहे बे, माझी गाडी पकडायची? तु मला कायदा शिकवणार आहे का? या घटनेबाबत पो.उ.नि. अनमोड यांनी सविस्तर नोंद घेतली. या नोंदीनंतर महिला प्रोबेशनरी डीवायएसपी जगताप यांनी देखील नोंद घेतली. या नोंदी दरम्यान सदर आरडीसी यांचे आडनाव सुर्यवंशी असल्याचे अनमोड यांना समजले. सदर प्रकरण मिटवून घेण्याचा सल्ला वरिष्ठ पातळीवरुन अनमोड यांना देण्यात आला होता असे समजते. या प्रकरणी कोणतेही चालान न घेता वाहन बेकायदा सोडून देण्यात आले असल्याचे सांगण्यात येते. या प्रकरणी सीसीटीव्ही फुटेज तपास अधिकाऱ्यांनी हस्तगत करण्याची मागणी वजा विनंती अनमोड यांनी केली आहे. दरम्यान हिंगोलीचे प्रभारी पोलिस उप अधिक्षक (गृह) यांनी दुसऱ्या दिवशी एक प्रेस नोट प्रसिद्धीस दिली. त्यात म्हटल्यानुसार उप निरिक्षक साईनाथ अनमोड यांनी निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी हिंगोली यांच्याविरुद्ध कलम ३५३, २९४, ५०६, १८८ तसेच १०८ केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ सह कलम १७९ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार दिली आहे. सदर तक्रार पोलिस अधिक्षक हिंगोली यांच्या आदेशाने रामेश्वर वेंजने, उप विभागीय पोलिस अधिकारी, उप विभाग हिंगोली शहर यांच्याकडे चौकशीकामी वर्ग करण्यात आली आहे. या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे स्पष्टीकरण प्रसिद्धी पत्रकात नमुद करण्यात आले आहे. दरम्यान या घटनेमुळे हिंगोली शहरात खळबळ माजली आहे.

# भिवंडी कोविड रुग्णालयाकडे मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष; रुग्णालयात पीपीई किटचा खच तर रुग्णांची होते गैरसोय

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडीत कोरोना रुग्णाची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांच्या चिंतेत देखील वाढ होत आहे. कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येस मनपा प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप येथील दक्ष नागरिक वारंवार करत असतांनाच आता शहरातील एकमेव कोविड रुग्णालय असलेल्या स्व इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयाकडे मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. या रुग्णलयात डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी वापरलेल्या पीपीई किटचा अक्षरशः खच पडला असल्याचा व्हिडीओ सध्या समाज माध्यमांवर सध्या चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्हायरल व्हिडिओमुळे मनपा प्रशासनाचा हलगर्जी कारभार समोर आला आहे.



भिवंडी कोविड रुग्णालयात मागील काही दिवसांपूर्वी वापरलेले पीपीई किट व इतर टाकाऊ साहित्य उचलण्यासाठी मनपाची कोणतीही कचरा उचलणारी गाडी अथवा एकही घंटा गाडी आली नसल्याने या रुग्णालयात पीपीइ किटचा अक्षरशः खच पडला आहे. या वापरलेल्या पीपीईकिटच्या ढिगाऱ्याच्या बाजूलाच कोरोना रुग्णांवर उपचार होत आहेत. तर कोरोना रुग्णांसाठी अत्यावश्यक असलेल्या ऑक्सिजन रूममध्ये तर अक्षरशा घाणीचे साम्राज्य असून पावसाचे गळके पाणी या ऑक्सिजन रूम मध्ये साचले असून याच ठिकाणी ऑक्सिजन लागणाऱ्या कोरोनाबाधित रुणांवर उपचार होत आहेत. तर रुग्णालयाच्या बाहेर देखील रुग्णवाहिकेच्या चालक व वाचकांनी काढून फेकलेले वापरलेल्या पीपीई किटचा ढिग साचला आहे.

एकिकडे भिवंडीतील कोरोना बाधितांचा आकडा हजारी पार करून ११४५ वर पोहचला आहे तर ७२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे गुरुवारी एकाच दिवसात तब्बल ३३ कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला होता.

त्यातच आता मनपाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर आणणारी व्हिडीओ क्लिप समाज माध्यमांवर चांगलीच व्हायरल झाल्याने मनपा प्रशासन अडचणीत आले आहे. विशेष म्हणजे कोरोना रुग्णांवर चांगले उपचार व्हावेत म्हणून राज्य शासनाने भिवंडी महापालिकेस सात कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर केला आहे. मात्र कोविड रुग्णालयाच्या झालेल्या या दुरावस्थेमुळे शासनाचा येत असलेला निधी भिवंडीकरांच्या आरोग्यसेवेसाठी नक्की वापरण्यात येईल का यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# अहमदपूर-सांगवी फाट्यावर २१ लाखाचा गुटखा जप्त

**अहमदपूर/प्रतिनिधी**

राज्यात प्रतिबंधित असलेला गोवा गुटख्याची तस्कारी करणाऱ्या ट्रकला पकडून सुमारे २१ लाख रुपयेचा गोवा गुटखा व ट्रक असा २७ लाखांचा मुद्देमाल जप्त करीत अहमदपुर पोलिसांनी जोरदार कामगिरी केली आहे. या प्रकरणी अहमदपूर पोलिस ठाण्यात एक जणाविरोधात अन्न सुरक्षा व मानके अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अहमदपूर पोलिस करीत आहेत.




याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की,सांगवी फाटा येथे जिल्हा नाका-बंदी कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी पो.ह./८०३ राठोड पो.ना./११०९ तांबरे, पो. कॉ.१४३५ देशमुख, होमगार्ड गायकवाड हे कर्तव्य बजावत असताना नाका-बंदी दरम्यान ट्रक क्रमांक एम.एच.२५ यू ०२५९ हा ट्रक थांबवून तपासणी केली असता सदर ट्रक मध्ये गुटखा असल्याचे निदर्शनास आले. सदरचा ट्रक पोलीस स्टेशन अहमदपूर येथे आनण्यात आला. पुढील कार्यवाही अन्न व औषध प्रशासन सुरक्षा अधिकारी श्री.विठ्ठल लोंढे व सपोनि आर.एस.केदार यांनी केली .सदर ट्रकमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा गोवा १००० च्या ३५ मोठ्या बॅगा याची किंमत २१ लाख रुपये व ट्रक क्रमांक एमएच २५ यु ०२५९ याची किंमत अंदाजे सहा लाख असा एकूण २७ लाख रुपयांचा मुद्देमाल वाहतूक करीत असताना मिळून आला आहे. सदरची कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षकराजेंद्र माने,अप्पर पोलीस अधीक्षक हिमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अश्रि्वनी पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली अहमदपूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनिलकुमार पुजारी व सपोनि केदार व पोलीस कर्मचारी राठोड, तांबरे, देशमुख, समुखराव, होमगार्ड गायकवाड यांनी कामगिरी केली. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी विठ्ठल लोंढे यांचे फिर्यादीवरून आरोपी नामे सुनिल सिद्धनाथ सुतार तालुका उमरगा यांचे विरुद्ध गुन्हा दाखल आहे.

# नागपुरात जुगार खेळणाऱ्या नगरसेवकासह आरोग्य कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल

**नागपूर/प्रतिनिधी**

कोरोना विरोधातल्या लढ्यात डॉक्टर, आरोग्य सेवेचे कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांची भूमिका महत्वाची आहे. मात्र, हे सर्वच कायदा पायदळी तुडवत जुगार सारख्या बेकायदेशीर कृत्यात व्यस्त असल्याचं नागपुरात समोर आलं आहे. नागपूर पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने काल रात्री अत्रे लेआऊट परिसरातल्या आनंदनगर या उच्चभ्रू कॉलोनीमध्ये जेव्हा धाड टाकली. तेव्हा एका बंगल्यात नागपूर महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती आणि विद्यमान नगरसेवक, शासकीय रुग्णालयातील एक वरिष्ठ डॉक्टर यांच्यासह आरोग्य सेवेतील काही कर्मचारी हे जुगार खेळताना आढळले. त्यामुळे कोरोना संकटाच्या काळात समाजाला ज्या वर्गाकडून मोठी अपेक्षा आहे. त्यापैकीच काही लोकं नियमबाह्य कामे करत असल्याचे उघड झाले आहे.



नागपूर पोलिसांच्या गुन्हेशाखेच्या पथकाला काल रात्री आनंदनगर भागात एका बंगल्यात अनेक लोकं जमा होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पथकाने जेव्हा चाचपणी केली. तर हे सर्व लोकं शहरातील विविध भागातून या ठिकाणी जुगार खेळण्यासाठी एकत्रित आल्याचे उघड झाले. पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात पथकाने जेव्हा आनंदनगर भागातल्या त्या बंगल्यावर धाड टाकली. तेव्हा आतमध्ये अनेक लोकं जुगार खेळताना आढळले. सुरुवातीला या सर्वांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात अपयशी ठरल्यानंतर जुगार खेळणाऱ्या या बड्या मंडळींनी पोलिसांवर दबाव आणत जुगाराची कारवाई करू नये. प्रकरण दाबून टाकावे असे प्रयत्न केले.

मात्र, शासनाने रात्री नऊ नंतर पहाटे पाच वाजेपर्यंत संचारबंदी लागू केली असताना नागपुरातील विविध भागातून एवढे लोकं त्या ठिकाणी गोळा झाले होते. तसेच जुगारासारखे बेकायदेशीर कृत्य त्या ठिकाणी केले जात होते. त्यामुळे कोणत्याही दबावात न येता पोलिसांनी त्यांची कारवाई पूर्ण केली. पोलिसांनी त्या ठिकाणाहून हजारो रुपयांची रोकड, दहा मोबाईल, तीन कार, दोन बाईक्स याच्यासह एकूण १९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी त्या ठिकाणी जुगार खेळणाऱ्या नगरसेवकासह सरकारी डॉक्टर, आरोग्य सेवेतील कर्मचारी या सर्वांविरोधात गुन्हा दाखल करत कारवाई केली आहे.

गेल्या एका आठवड्यात नागपुरात जुगार अड्ड्यावर पोलिसांची ही तिसरी कारवाई आहे. या पूर्वी वेळा हरीश्चंद्र गावाजवळ एका ढाब्यावर जुगार खेळले जात असताना ११ जणांना पकडण्यात आले होते. तर गणेशपेठ हद्दीत एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये जुगार खेळणाऱ्या काही व्यापाऱ्यांना ही पोलिसांनी पकडले होते. त्यामुळे लॉकडाऊन मधील शिथिलता जरी उद्योग, व्यापार सुरु करून लोकांना त्यांचे रोजगार पुरवत करता यावे यासाठी देण्यात आली असली. तर समाजातील काही वर्ग या काळाचा वापर जुगार सारखे बेकायदेशीर कृत्यांसाठी करत असल्याचे दुर्दैवी चित्र दिसून येत आहे.

# प्रधानमंत्री यांच्या हस्ते दिव्यांगांना साहित्य वाटपाच्या कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वांनी परस्परांत समन्वय ठेवावा-जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी**

केंद्र शासन व अलिमको या संस्थेच्या वतीने जिल्ह्यातील ८ हजार ७९७ दिव्यांगाना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हर्च्युअल(आभासी) पद्धतीने साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समाज कल्याण विभाग, महापालिका, सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी यांनी परस्परांत योग्य समन्वय ठेवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य दिव्यांगांना साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्रीकांत मार्गदर्शन करीत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, महापालिका आयुक्त देविदास टेकाळे, लातूर महापालिकेचे उपायुक्त हर्षल गायकवाड, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत श्री. साळुंके, सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी तसेच दिव्यांगासाठी काम करणाऱ्या संस्थेचे प्रमुख सुरेश पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीकांत पुढे म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील दिव्यांगाना कृत्रिम साहित्य वाटप करण्यासाठी माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी माहे जुलैच्या पहिल्या आठवड्यात लातूर जिल्ह्यात येणार होते परंतु कोरोनाच्या अनुषंगाने हा कार्यक्रम व्हर्च्युअल पद्धतीने करण्याचे निश्र्चित झाले असून हा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी करण्याची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेची असून सर्व संबंधित विभागांनी दिलेले जबाबदारी चोखपणे पार पाडावी असे निर्देश त्यांनी दिले. सर्व तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व आपल्या तालुक्यातील सर्व दिव्यांगाना तालुका मुख्यालय घेऊन येणे व साहित्य वाटप झाल्यानंतर त्यांना कोणत्याही अडचणी शिवाय त्यांच्या घरी पोहोच करणे हे तालुका प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रत्येक १०० दिव्यांग व्यक्तीसाठी नोडल अधिकार्यांची नियुक्ती करावी. त्यासाठी समाज न्याय विभागाच्या शिक्षकांच्या तसेच विस्ताराधिकारी यांच्या ऑर्डर काढाव्यात.

दिव्यांग व्यक्तींचा व्हाट्सअप ग्रुप तयार करावा व त्यांना वेळोवेळी



अद्यावत माहिती देण्यात यावी. तसेच दिव्यांगासाठी काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या सामाजिक संस्थांचा संघटनांचा सहभागी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी घेण्यात यावा असे आव्हान जिल्हाधिकारी श्रीकांत यांनी केले.

जिल्हा मुख्यालयाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन सभागृहात घेण्यात येणार असून प्रत्येक तालुक्याच्या मुख्यालयी या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी योग्य जागांची निवड करावी व त्याठिकाणी दिव्यांगासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात. त्याच प्रमाणे या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा प्रशासनाच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येतील त्यावर योग्य ते नियंत्रण ठेवावे व हा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी करावा असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीकांत यांनी केले. प्रारंभी समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे जुलैच्या पहिल्या आठवड्यात लातूर जिल्ह्यातील दिव्यांगाना वर्च्युअल पद्धतीने कृत्रिम साहित्य वाटप कार्यक्रमाची संभाव्यता आहे असे सांगितले. जिल्ह्यात मागील काळात समाजकल्याण विभागामार्फत जिल्ह्यातील दिव्यांगाचे तालुकानिहाय शिबिर घेण्यात आले होते.

त्या शिबिरामध्ये जवळपास ११ हजार दिव्यांगाची नोंदणी झालेली असून त्यातील ८ हजार ७९७ दिव्यांगाना विविध प्रकारचे कृतीम साहित्याची आवश्यकता असल्याची माहिती नोंदवली होती. त्याबाबतची तपासणी आरोग्य विभाग मार्फत करण्यात येऊन त्या दिव्यांगांना साहित्य देण्याबाबत प्रशासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने माननीय प्रधानमंत्री यांच्या हस्ते वर्च्युअल पद्धतीने हा साहित्य वाटपाचा संभाव्य कार्यक्रम होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीकांत यांनी सर्व तहसीलदार व सर्व गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यात या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीची माहिती घेतली. तसेच तालुक्यातील दिव्यांग असलेल्या प्रत्येक गावात कशा पद्धतीने वाहन व्यवस्था करण्यात येणार आहे त्याबाबत सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या. व समाजकल्याण विभागाने यात पुढाकार घेऊन तालुकानिहाय बैठका घेऊन त्याचा अहवाल सादर करावा व या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न करावेत, त्यांनी सूचित केले.

# पालकमंत्र्यांच्या प्रयत्नातून लातूर महानगरपालिकेला १५ कोटींच्या विकास निधी वापराचा मार्ग मोकळा

**लातूर/प्रतिनिधी,** राज्यातली सर्वच महानगरपालिका प्रमाणे लातूर शहर महापालिकेस राज्य शासनाच्या वतीने विविध योजना मधून विकास कामे राबविण्यास निधी उपलब्ध करून दिला जातो. सन २०१७-१८ साली मूलभूत सोयी सुविधा विकास योजना अंतर्गत १० कोटी तसेच विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत ५ कोटी रुपयांचा निधी लातूर शहर महापालिका प्राप्त झालेला होता परंतु तत्कालीन परिस्थितीत निर्णयाचा अभावामुळे सदर निधी अखर्चित राहिलेला होता. २ वर्षे उलटून जाऊनही निधी खर्च न झाल्याने राज्य शासनाने सदर निधी वापराकरिता स्थगिती दिलेली होती. परंतु लातूर शहर महापालिकेत सत्ताबदल झाल्यानंतर दिनांक २० जानेवारी २०२० रोजी झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने या निधीअंतर्गत शहरातील विकास कामांची निवड केलेली होती. सदर निधी वापरास मंजुरी मिळवून देण्याची विनंती महापौर व उपमहापौर यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्याकडे केली होती. याच अनुषंगाने पालकमंत्री यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून १५ कोटी रुपयांचा निधी विकास कामांवर खर्च करण्याकरिता मार्च २०२१ पर्यत मुदतवाढ मिळवून दिल्याने या निधी अंतर्गत निवडण्यात आलेले विकास कामे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कोरोना विषाणूच्या संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या लातूर महानगरपालिका द्वारे सदर निधी शहरातील विविध विकास कामांवर खर्च केला जाणार असल्याने नागरिकांना याचा लाभ होणार आहे. सुमारे २ वर्ष अखर्चित राहिलेला निधी वापरास मुदतवाढ मिळवून दिल्यामुळे शहर विकास गती प्राप्त होणार असल्याबद्दल महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांचे मनपा पदाधिकारी, नगरसेवक तथा लातूरकरांच्या वतीने आभार व्यक्त केले.



॥ प्रथम स्मृतीदिन ॥
* भावपुर्ण आदरांजली *
आठवणीतील क्षण सदा राहतील स्मरणी ॥
अश्रूंची फुले ही वाहतो तुमच्या चरणी ॥
दादा
देवाज्ञा ६ जून २०१९
कै. शंकरराव निवृत्ती पाटोळे
(लातुर महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी)
महाराष्ट्रातील 'क्राईम संध्या'च्या प्रतिनिधींकडून दादांना भावपुर्ण आदरांजली!
लक्ष्मणराव शंकरराव पाटोळे (संपादक - क्राईम संध्या)
ॲड. अनिल सांडभोर (निवृत्त डीवायएसपी)
गणेश चव्हाण (कार्यकारी संपादक)
किशोर साटम (पत्रकार, वसई)
रूपेश वाढे (पत्रकार, वसई)
किरण सोलंकी (पत्रकार, विरार)
शंकर सोनावणे (पत्रकार, लातूर)
राम शंकरराव पाटोळे (सह संपादक, लातूर)
ललितकुमार खरे (पत्रकार, जळगाव)
शकिल मणियार (पत्रकार, देवणी)
शिवाजी मोरे (पत्रकार, औसा)
रवि वाघमारे (पत्रकार, परभणी)
बसवेश्वर डावळे (पत्रकार, उद्गीर)
लक्ष्मण उजगरे (पत्रकार, परभणी)
युनूस शेख (पत्रकार, अहमदपुर)
हामिद शेख (छायाचित्रकार, लातूर)
सुरेश फरकांडे (पत्रकार, चाकुर)
संजय शिंदे (पत्रकार उस्मानाबाद)
अबेदखाँ बागवान (पत्रकार, सोलापुर)
अमर करकरे (पत्रकार, लातूर)
तैसिफ सैय्यद (पत्रकार, ता. अहमदपुर)
वसंत कांबळे (पत्रकार, ता. औसा)
अनंता पाटील (सल्लागार)
रवि शेट्टी (पत्रकार, नालासोपारा)
वसंत कांबळे (पत्रकार, पुणे)
संजय लांडगे (पत्रकार, वाडा)
शिरीष वानखेडे (पत्रकार, कल्याण)
राजाराम ओव्हाळ (पत्रकार, विरार)
राजेंद्र वेदांते (पत्रकार, नवी मुंबई)
रवि शिंदे (पत्रकार, भिवंडी)
प्रेमशंकर गुप्ता (पत्रकार, विरार)
अलताफ शेख (पत्रकार, जव्हार)
जब्बार सोलंकी (पत्रकार, पालघर)
मोहन कुंभार (पत्रकार, कोल्हापुर)
परमेश्वर गडदे (पत्रकार, मुंबई)